| १ | पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील मुख्य रस्त्यावरील चौकांचे सुशोभिकरण करणे | २०.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | - | ५.०० लाख | ५.०० लाख | ० | ५.०० लाख |
| २ | राजमाता जिजाऊ | २०.०० | स्थापत्य | ५६/१०२ | १०.३७ | ० | ५.०० | १०.३२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उड्डाणपुलाखालील सेवा रस्ते Urban Street Design नुसार विकसित करणे | कोटी | विशेष योजना | | कोटी | | लाख | कोटी |
| | एकुण | | | | | ५.०० लाख | ५.०० लाख | १०.३७ कोटी |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील "ड" व "ह" क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत असणा-या शहरातील छोट्या मोठ्या तसेच बीआरटी रस्त्यांवर नागरिकांच्या सोयीसाठी व शहराच्या सुशोभिकरणसाठी अत्यंत कल्पक व सुंदर नामफलक दिशादर्शक फलक तसेच रस्ता सुरक्षा चिन्हे इ. उभारणे आवश्यक आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधीतून र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) एवढी तरतुद वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामाचा सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रक पान क्र. | अ .क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२० ची मुळ तरतुद | वाढ | घट | सन २०२० २१-ची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा क्षेत्रातील ड व ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असणाया - विविध रस्त्यांवर नामफलक व दिशादर्शक फलक उभारणे | - | - | - | ५,००,००,००० | ० | २५,००,००० | ० | २५,००,००० |
| २ | महापौर विकास निधी | महापौर विकास निधी | ६३ | १८ | ५,३५,००,००० | ५,३५,००,००० | ० | २५,००,००० | ५,१०,००,००० |
| | एकूण | | | | १०,३५,००,००० | ५,३५,००,००० | २५,००,००० | २५,००,००० | ५,३५,००,००० |

तसेच महापालिका सभा ठराव क्र. ५७५, दिनांक १३/१०/२०२० नुसार खालील विकास कामाचे नावात बदल करणेस व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेस व तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | महासभा ठराव क्र.५७५ , दि.१३/१०/२०२० नुसार कामाचे नाव | लेखाशिर्षक | अ.क्र. | पानांक | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | महासभा ठराव क्र.५७५ , दि.१३/१०/२० २० नुसार तरतुद | नावात बदल झालेल्या कामाचे नाव | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | विशेष योजना | महासभा ठराव क्र.५७५, दि.१३/१०/२०२० | | ५०००००००० | १०००१००० | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. ( पार्ट -१) | २०००००००० | ५००१००० | ० |
| | | | | | | | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. ( पार्ट -२) | २०००००००० | ५०००००० | ० |
| २ | प्रभाग क्र.७ भोसरी येथील स.नं.१ शेजारील नाल्याची सुधारणा करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | विशेष योजना | | | | १००००००० | | ५०००००००० | | १०००१००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | | | | | १०००१००० | १०००१००० |

तरी वरील प्रपत्रानुसार उपरोक्त स्थापत्य विषयक कामाचे सुधारीत नावास, सुधारीत प्रशाकीय मान्यतेस व सुधारीत तरतुदीस मान्यता देणेत येत आहे. तसेच तुळापुर येथे श्री.छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ आहे. दरवर्षी फाल्गुन आमावस्येला बलिदान दिन / छत्रपती संभाजी महाराजांची पुण्यतिथी म्हणून साजरी केली जाते. या ठिकाणी पिंपरी चिंचवडसह राज्यातील विविध भागातून जनता दर्शनासाठी येत असते. ग्रामपंचायतील सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी अभावी अडचणी येत असतात. तरी छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान दिनानिमित्त तुळापुर ग्रामपंचायतीस महाराजांचे समाधी स्थळाचे ठिकाणी मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हार-फुले इत्यादी करिता र.रू. ५,००,०००/- ( अक्षरी र.रू. पाच लाख फक्त) खर्चाची रक्कम मनपा हद्दीबाहेर महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ८९ नुसार उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ४

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.पअक/५/कावि/५४६/२०२०, दि.२३/१०/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७७२७
दि.०९/१२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर शहरातील विविध मलनिःसारण केंद्राव्दारे प्रक्रिया केली जाते. सदर मलनिःसारण केंद्रामधून बाहेर पडणा-या प्रक्रियायुक्त पाण्यावर पुढील प्रक्रीया करुन शहरातील औद्योगिक तसेच निवासी भागात पाणी पुरवठा करण्याकरीता [Recycling & Reuse] सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा तयार करण्यात आला आहे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती मार्फत मा.महापालिका सभा ठराव क्र.३३८, विषय क्रमांक १० दि.२०/१२/२०१८ नुसार उक्त पुनर्वापर व पुनर्चक्री करणाच्या विस्तृत धोरणास तसेच सदरच्या प्रकल्पाची अंमलबजावणी PPP किंवा HAM Mode l नुसार करणेचे प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर प्रक्रियायुक्त पाणी पुरवठ्याकरिता सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा [Master Plan] तयार करण्यात आला आहे. सदर Master Plan मध्ये शहराच्या भौगोलिक रचनेनुसार चार भाग करण्यात आले आहेत.

1. भाग क्रं. १ : पिंपळे सौदागर, वाकड, हिंजवडी MIDC चिंचवड
2. भाग क्रं. २ : चिखली MIDC
3. भाग क्रं. ३ : निगडी प्राधिकरण व तळेगाव MIDC
4. भाग क्रं. ४ : चाकण MIDC

सदर आराखड्यानुसार संपूर्ण शहरासाठी प्रतिदिन १२० दशलक्ष लिटर एवढ्या प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापरकेला जाऊ शकतो. सदर Master Plan पैकी पहिल्या टप्प्यामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत Area Based Development (ABD) मधील पिंपळे सौदागर,तसेच वाकड, हिंजवडी MIDC Area याकरिता कासारवाडी मलनिःसारण प्रक्रिया केंद्रातून प्रतिदिन ७५ दशलक्ष लिटर सांडपाणि प्रक्रिया करून पाणीपुरवठा करणे प्रस्तावित आहे. तथापि, शहरासाठी विस्तृत आराखड्यामधून मनपा हद्दीबाहेरील हिंजवडी भागासाठी MIDC कडून

अद्याप MOU झाले नसल्याने सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यामधून वगळण्याचे तसेच शहरातील पाण्याची टंचाई असणा-या भागाचा समावेश करुन प्राधान्यक्रम बदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे, त्यानुसार शहरातील वेगाने वाढणा-या चिखली व च-होली भागाचा दुस-या टप्प्यातील भागाचा समावेश प्राधान्याने पहिल्या टप्प्यात करणेच्या प्रस्तावास मान्यता घेणे आवश्यक आहे. यामध्ये चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा १ (क्षमता १६ एम.एल.डी) हे ३० वर्षापेक्षा जुने झाले असून जुन्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. सदर STP ची दुरुस्ती करणेसाठी मोठा खर्च लागणार आहे. चिखली येथील सदर मलशुद्धीकरण केंद्राचे आयुष्यमान संपुष्टात येत असल्याने सदर मलशुद्धीकरण केंद्राची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. याकरिता सदर ठिकाणी सध्याच्या १६ MLD क्षमतेच्या केंद्राच्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील व भविष्यातील वाढणा-या सांडपाण्याचा विचार करुन २० MLD क्षमतेचा MBR तंत्रज्ञानावर STP करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे. नूतनीकरण प्रस्तावित असलेल्या प्रकल्पातून पुनर्वापर योग्य पाण्याची निर्मिती करण्यात येईल. त्यामुळे खर्चात बचत होणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनर्वापर व पुनर्चक्रीकरणाच्या प्रकल्पाची निविदा काढणेकामी विविध तांत्रिक मते,कल समजण्या हेतूने विविध संभावित इच्छुक निविदाधारकांची अनौपचारिक बैठक [Pre Tender Conference] दिनांक ११/०६/२०२० रोजी Online आयोजित करणात आली होती. सदर बैठकीमध्ये इच्छुक निविदाधारक यांनी प्रकल्प HAM पद्धतीमध्ये कमीत - कमी ६०% प्रकल्प किमतीची रक्कम उभी करू शकतात तसेच विविध वित्तीय संस्था व वित्तीय पुरवठा करणा-या धनको यांनी प्रकल्प उभारणीच्या काळात कर्जावरील लागणारे व्याज IDC (Interest During Construction) हे प्रकल्प किमतीमध्ये गृहीत धरावा अशी मागणी केली. त्याबाबत प्रकल्पाच्या Technical Appraisal Committee (TAC) कडे मागणी विचारार्थ ठेवली असता TAC समितीने या बाबींस मान्यता दिली आहे. तसेच, प्रकल्प अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १७७, ६६अ, कलम ६६ च्या पोटकलम ४१अ नुसार लोक खाजगी सहभागातून (PPP) किंवा HAM [Hybrid Annuity Model] पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण प्रक्रिया केंद्र व यंत्रणा उभारणी व  कलम १०९ नुसार विविध वितीय पुरवठादाराद्वारे निधी उभारणेसाठी मा. आयुक्त यांना कलम ७२ (ब) अन्वये प्राधिकृत करणेस मान्यता देणेचेही प्रस्तावित आहे.प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलून शहराच्या वाढीचा वेग व पाण्याचा तुटवडा असलेल्या भागांचा समावेश पहील्या टप्प्यात करुन खालील भागाचा समावेश करणेस मान्यता आवश्यक आहे.

1. वाकड, पिंपळ सौदागर, पिंपळेगुरव, कासारवाडी, चिंचवड, चिखली च-होली व MIDC क्षेत्रात  कासारवाडी येथून ७५, चिखली मधून २० व च-होली येथून ५ असे एकुण प्रतिदिन सुमारे १०० दशलक्ष लिटर इतके पाणी पुनर्चक्रीकरणव्दारे उपलब्ध करणे व त्यापैकी सुमारे

८ एम.एल.डी. पाणी पिण्याच्या गुणवत्तेचे शुध्द करणेसाठी RO प्रणालीचा वापर करणे.

2. प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराकरिता आवश्यक त्या ठिकाणी आराखड्यानुसार सुमारे ३०६ किमी प्राथमिक जाळे तयार करणे.

3. वाकड, पिंपळे सौदागर, कासारवाडी एम.आय.डी.सी. चिखली व च-होली अशा पाच

ठिकाणी १ ते ५ दशलक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभाची निर्मिती.

4. या प्रस्तावित योजने अंतर्गत येणारा खर्च तसेच प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीतील व्याज इत्यादींचा समावेश करता प्रकल्पाचा मुळ खर्च र.रु.५३२/- कोटी व जीएसटी, रॉयल्टी Contingencies Charges, Interest During Construction व Work Establishment Charges इत्यादी सह एकत्रित प्रकल्पाचा अंदाजित खर्च र.रु.६५४/- कोटी इतका येत आहे. त्यास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

5. सदर योजना HAM पद्धतीनेच राबविण्याचे प्रस्तावित असून यामध्ये एकूण खर्चापैकी मनपा मार्फत जास्तीत जास्त ४०% भांडवली खर्च कंत्राटदारास प्रकल्प उभारणीच्या कालावधीत टप्प्याने वितरीत करण्यात येईल व उर्वरित हिस्सा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून ७ वर्षात त्रैमासिक पद्धतीने वितरीत करण्यात येईल. सदर प्रकल्पाच्या १५ वर्षाच्या परिचालनाची तसेच देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सबंधित ठेकेदाराची असणार आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर प्रक्रीया करुन त्याचे पुनर्चक्रीकरण तसेच पुन:र्वापर [Recycling & Reuse] करणे या प्रकल्पाच्या सुधारित र.रु.६५४/- कोटीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस किंवा प्रकल्पाच्या किंमतीमध्ये बदल झालेस होणारे प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच यापूर्वी मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ७१, दिनांक ०७/१२/२०१८ रोजी मान्यता दिलेल्या विषयामध्ये वरील नमूद केलेप्रमाणे शहराची होणारी वाढ व काही भागात असणारी पाणी टंचाई यांचा विचार करुन प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलणेस तसेच आवश्यकते प्रमाणे प्रकल्पाची व्याप्ती निश्चित करणेस तसेच सदरचा प्रकल्प कलम १०९ नुसार खाजगी सहभागातून विविध वित्तीय पुरवठ्याव्दारे निधी उभारणेच्या (PPP/HAM) धोरणास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १७७, ६६अ, कलम ६६ चे पोटकलम ४१ अ त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी कलम ७२(ब) अन्वये सर्व मा.आयुक्त यांना अंमलबजावणी प्राधिकारी म्हणून सर्व वित्तीय अधिकार देवून निविदा मान्यतेकामी सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करणेचे सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर हा विषय खुप मोठा आहे आणि मा.महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो की या विषयाच्या संदर्भामध्ये आपण काय नेमक करणार आहेत त्याच प्रेझेंटेशन दयाव आपल्याला पाण्याची गरज काय आहे, आपण कशा पध्दतीने करतो त्यासंदर्भातील प्रेझेंटेशन देण्याचे आदेश दयावेत.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** प्रेझेंटेशन आपल्या सर्वांना दाखवण्यात येईल तोपर्यंत हा विषय तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५८७ विषय क्रमांक- ४

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.पअक/५/कावि/५४६/२०२०, दि.२३/१०/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७७२७
दि.०९/१२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५८८ विषय क्रमांक- ५

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.पवै/३/कावि/१५६/२०२०, दि.२८/१०/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७८६१ दि.२३.१२.२०२०
अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील छोट्या पाळीव प्राणी (कुत्रा, मांजर) इ. यांची एकुण संख्या व त्यांचे आयुष्य लक्षात घेता अचानक तसेच आजारांने उपचारा दरम्यान मृत प्राण्यांचे विल्हेवाटी बाबत नेहरुनगर पिंपरी या ठिकाणी छोटे पाळीव प्राणी दफन भुमी सन २००७ रोजी कार्यान्वित करण्यात आली होती. दहन मशिनच्या ठिकाणी दि.१६/१२/२०१६ ते दि.१६/०३/२०२० या कालावधीत एकुण १३०९ इतक्या पाळीव प्राण्यांचे दहन पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. या करीता सी.एन.जी. गॅस वापराचे मासिक देयके विभागामार्फत मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड यांना सरासरी र.रु.१५,०००/- ते र.रु.२०,०००/- इतकी रकम अदा करण्यात येत आहे. पावसाळ्यांच्या मोसमात या पाळीव प्राण्यांची मृतांच्या आकड्यांत वाढ होत असते. मागिल काही दिवसांपासुन स्वयंघोषित प्राणीप्रेमीं व्दारा शहरातील भटकी मृत कुत्री याठिकाणी आणुन दहन करण्याची मागणी करण्यात येऊन नाईलाजास्तव त्यांचे ही दहन केले जाते. वस्तुतः सदर सेवा ही पाळीव प्राण्यांकरीता म्हणजेच ज्यांचे मालक आहेत त्यांचे करीता निःशुल्क असुन भटके मृत प्राणी (मांजर, कुत्रा.) यांची म.न.पा.च्या आरोग्य विभागाव्दारे क्षेत्रिय कार्यालय निहाय विल्हेवाट लावण्यात येते. उपरोक्त पणे म.न.पा.व्दारा दहन मशिन देखभाल दुरुस्ती व गॅस चे देयके तसेच मशिन हाताळणारे म.न.पा.चे कर्मचारी यांचा खर्च पाहता आर्थिक भार जास्तीचा होत असल्याचे दिसुन येते. तरी मालकांचे मृत पाळीव प्राणी यांना प्रति जनावर शुल्क आकारणी संयुक्तीक राहिल. यास्तव पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पाळीव मृत कुत्रा व मांजर यांना खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे दर आकारणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | दहन शुल्काची रक्कम |
|---|---|---|
| १ | कुत्रा | २०००/- |
| २ | मांजर | २०००/- |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील प्राणी मालकांना देखिल र.रु.३०००/- इतकी दहन शुल्क आकारुन उक्त सेवा देण्यात येईल.तुलनात्मक दृष्ट्या उक्त

तक्त्यांतील दरांचा विचार करता, मशिन देखभाल दुरुस्ती कार्यरत कर्मचारी वर्ग, सी.एन.जी. गॅसचे दर लक्षात घेता प्रस्तावित दर माफक आहे. तसेच उपद्रव कारक स्वयंघोषित प्राणीप्रेमी यांना शिस्त लावणे देखिल शक्य होईल. तसेच प्रस्तावित केलेले दर मान्य झालेस म.न.पा. हद्दीतील पाळीव प्राणी मालकांना रहिवासी दाखल्यांचे पुरावा ग्राह्य धरुन मान्य दरानुसार सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल. सबब, प्रस्तावित केले नुसार छोटे पाळीव प्राणी दहन मशिन (Pet incinerator) वापरा करीता शुल्क आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयात पाळीव मृत कुत्रा व मांजर यांच्या दहनासाठी र.रू.२०००/- इतके दहन शुल्क प्रस्तावित केले आहे. सदर दहन शुल्काची रक्कम जास्त आहे ती कमी करून पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील तसेच हद्दीबाहेरील पाळीव मृत कुत्रा व मांजर यांच्या दहन शुल्काची रक्कम र.रू.१०००/- इतकी आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.संतोष कांबळे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५८९ विषय क्रमांक- ६

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.भूजि/०९/कावि/३३७/२०२०, दि.२३/१२/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.भूमि/०९/कावि/३१९/२०२०, दि.१८/१२/२०२०

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७९१० दि.२३/१२/२०२०
अन्वये.

भोसरी एमआयडीसी जे ब्लॉक अंतर्गत मोकळी जागा क्र.२९ येथील आरक्षण क्र.४५ मधील सदर भूखंड हा ताबा पावतीद्वारे सन १९८४ मध्ये महापालिकेकडे एमआयडीसीकडून हस्तांतरीत झालेला असून त्याचे क्षेत्रफळ ६०,३७८ चौ.मी. आहे. सदर भूखंडावर प्रस्तावित आरक्षणाच्या विकासाच्या अनुषंगाने बालनगरी प्रकल्प विकसित करण्याच्या विचाराने स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प विकास सुरु करण्यात

आलेला असून सदर प्रकल्पात मुख्यतः लहान मुलांना बालशिक्षण हा विषय डोळ्यासमोर ठेवून विविध क्षेत्रांतील सामान्य ज्ञान देणा-या सेवा व संस्थांची माहिती देण्याकरीता बांधकाम सुरु करण्यात आले. सदर ठिकाणी लहान मुलांना शिक्षणासाठी अग्निशमन, रुग्णालय, बँकींग, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस अश्या प्रकारच्या सेवांची माहिती देणे व सोबत मनोरंजन व त्याकरीता अँम्पीथिएटर इ. कक्ष निर्माण करणे प्रस्तावित आहे. सदर बालनगरी प्रकल्पाचा टप्पा-१ सुरु करण्यात आला असून दि.२५ मे २०१८ मध्ये टप्पा-१ चे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्याअंतर्गत सुमारे ५,००० चौ.मी. इतके बांधकाम पूर्ण करण्यात आले असून त्यावर सुमारे रु.२० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचे पुढील टप्प्यात बांधकाम करण्यापूर्वी सदर प्रकल्प चालविण्याकरीता Expression Of Interest (EOI) मागविण्यात आलेला असून त्यास कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. दरम्यानच्या कालावधीत राज्यातील विविध शहरांमध्ये स्थित असलेल्या चित्रकला महाविद्यालयांकडून तसेच बॉम्बे आर्ट सोसायटीसारख्या प्रसिद्ध संस्थेकडून महाराष्ट्रामधील कला विकासासाठी ललित कला अकादमीच्या विभागीय केंद्रासाठी सदर जागा देण्याबाबतीत विचारणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ललित कला अकादमीचे विद्यामान अध्यक्ष श्री.उत्तम पाचारणे यांनी महाराष्ट्रातील विविध प्रतिनिधींसमवेत जुलै महिन्यात सदर प्रकल्पास भेट देवून सदर प्रकल्पाची जागा त्यावरील बांधकामासह ललित कला अकादमीच्या विभागीय केंद्राच्या उभारणीसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे मान्य करुन सदर जागा महापालिका व राज्य शासनामार्फत त्यावरील बांधकामासह ललित कला अकादमीस मिळावी अशी विनंती केली. ललित कला अकादमी ही संस्था भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक कला व परंपरा यांचे जतन, संवर्धन करण्याकरीता राष्ट्रीय स्तरावरील असलेली अग्रणी संस्था असून चित्रकला, शिल्पकला, वास्तूकला व अन्य उपयोजित कला यांचा अभ्यास, संवर्धन, प्रसार व कलाशिक्षण देणा-या संस्थांना उत्तेजन व आर्थिक मदत देणे इ. कार्य करण्याकरीता सदर अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय राष्ट्रीय स्तरावर, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय कलाकारांची कलात्मक प्रदर्शने भरवणे, कलाविषयक साहित्य प्रकाशित करणे व नवीन कलाकारांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे इ. स्वरुपाची महत्वपूर्ण कामे संस्थेमार्फत करण्यात येतील. तरी, ललित कला अकादमीत भारत सरकार यांची मागणी व संपूर्ण प्रकल्पाची मागणी मधील अत्युच्च व्यापक हेतू विचारात घेता पिंपरी चिंचवड शहराच्या आगामी विकासाच्या अनुषंगाने व शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याच्या अनुषंगाने ललित कला अकादमी, भारत सरकार यांचे विभागीय केंद्र जर

पिंपरी चिंचवड शहरात स्थापन झाल्यास शहरास व पर्यटनात महापालिकेस एक वेगळा नावलौकिक प्राप्त होण्यास मदत होणार आहे. सदर प्रकल्पामुळे राज्यातील व पर्यायाने शहरातील विद्यार्थ्यांना, युवकांना व ज्येष्ठ कलाकारांना सर्वांनाच एक व्यासपीठ उपलब्ध होणार असून त्यामार्फत स्वतःची कला जोपासना ही अधिक विकसित व परिपूर्ण करणे तरुण व होतकरू कलाकारांना शक्य होणार आहे. या स्वायत्त ललित कला अकादमीच्या माध्यमातून चित्र, शिल्प व इतर कलांचे एक कायमस्वरुपी प्रदर्शन स्थापन झाल्यास शहरामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकृष्ट करण्याकरीता सदर बाब सहाय्यभूत होणार आहे. शहरामध्ये नागरीकांना आपली कलात्मक अभिरूची व सांस्कृतिक ठेवा तसेच विविध उपयोजित कलांचा आस्वाद घेण्याच्या अनुषंगाने देखील मोठा हातभार लागणार आहे. बालकांचा व विद्यार्थ्यांचा चतुरस्त्र विकास साधण्याच्या अनुषंगाने देखील मूळ आरक्षणाच्या संकल्पनेशी निगडीत सदर वापर असून केवळ पिंपरी चिंचवड शहरासाठी नाहीतर संपूर्ण राज्यासाठी सदर केंद्र हे एक मानदंड होऊ शकणार आहे. सदर प्रकल्पाची जमिन ही एमआयडीसीकडून विनामूल्य हस्तांतरीत झालेली असल्या कारणाने हस्तांतरीत करण्यापूर्वी एमआयडीसी तसेच राज्य शासनाची देखील मान्यता घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच सदर ठिकाणी आत्तापर्यंत सुमारे ५,००० चौ.मी. इतके बांधकाम महापालिकेमार्फत करण्यात आले असून सदर बांधकाम वापरण्यायोग्य असून भविष्यातील बांधकाम ललित कला अकादमी मार्फत त्यांच्या निधीतून करण्यात येणार आहे. तरी अस्तित्वातील बांधकाम हस्तांतरीत करण्याकरीता सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी वरील सर्व बाबींचा पिंपरी चिंचवड शहरास व पर्यायाने महापालिकेस होणारा व्यापक फायदा विचारात घेता पुढील सर्वसाधारण सभेत ठरणार अशा अटी-शर्तींच्या अधिन राहून सदर प्रकल्प राज्य शासनाच्या मान्यतेने त्यावरील बांधकामासह ललित कला अकादमी, भारत सरकार या संस्थेस नाममात्र दराने देणेकामी सदरचा विषय महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७९ (क) व ७९ (ग) नुसार मान्यता देणेत येत आहे.

**प्रकल्प राबविण्याकरीता महापालिकेमार्फत प्रस्तावित अटी व शर्ती :**

(१) पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील कलाकारांना वर्षातील पंधरा दिवस (दोन आठवडे) कलाप्रदर्शन भरवणे, प्रदर्शन भरवणे अथवा वर्कशॉप आयोजित करणे याकरिता राखीव ठेवणे.

(२) वर्षभरात नियोजित करण्यात येत असलेल्या कार्यशाळा, प्रशिक्षणांमध्ये स्थानिक कलाकारांना प्राधान्य देणे.

(३) विविध प्रदर्शने, कला दालने इ. पाहण्यासाठी स्थानिक नागरीकांकरीता

सवलतीचे दर आकारणे.
(४) पुढील विकासाच्या टप्प्यात आवश्यक निधी ललित कला अकादमी, भारत सरकार यांच्या माध्यमातून उभारणे.

**मा.शारदा सोनवणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ७

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१५/१६८/२०२० दि.०२/११/२०२०
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.२
दि.९/१२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाचे आदेशक्र.टीपीएस।१८९३। १२७६ ।सीआर ।१९४।९३।युडी-१३, दि.१८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर करणेत आली आहे. मौजे पिंपरी वाघेरे येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. / सि.स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | सुधारित मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | सं.न. २२४ ते २२९ यामधिल सि.स.नं. १११०, १११९/१३ ते १११९/१६ ११६५, ११७०, ११८५, १२५४, १२६७/२ ते १२६७/५, १२६८, १२६८/१,१२६८/२, | ३०००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन

करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी वाघेरे येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व आरक्षणे नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणे व भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

१) पवना नदी लगत स.नं. ३११ ते ३२२, इत्यादी पर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता.

२) पवना नदी कडील स.नं. २,३,४ ते ११ इत्यादी पर्यंत मंजुर विकास योजनेतील १५ मी. दक्षिण-उत्तर रस्ता.

३) स.नं.१,२ इत्यादी मधील आ.क्र.१६२, खेळाचे मैदान

तसेच मौजे आकुर्डी येथील ६०.०० मी. रस्त्याने बाधीत होणा-या आंबेडकर नगर येथे सुमारे २६० घरे (झोपडपट्टी) आहेत सदर झोपडट्टीच्या दोन्ही बाजुस पुर्ण क्षमतेचा रस्ता विकसीत आहे. या झोपडपट्टीमुळे वाहतुकीच्या रहदारीस अडथळा होत असलेने, सदर बाधितांचे पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर बाधितांचे पुर्नवसन केल्यास ६०.०० मी. रस्ता संपुर्ण खुलासा होऊन वाहतुकीचा अडथळा कमी होईल.

तरी सदर रस्ता बाधीतांचे पुर्नवसन मौजे आकुर्डी येथील ताब्यात आलेल्या आरक्षण क्र. २६८ बेघरांसाठी घरे (HDH साठी आरक्षीत असणारा भुखंड) यामध्ये होणेस व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळेगुरव येथील स.नं. ५१ मधील मंजूर विकास योजनेतील प्रस्तावीत १८ मी. रुंद उर्वरित रस्ता नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणे व भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्याचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे/संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|
| १ | १८ मी.रस्ता | स.नं. ७८ ते ११९ मधील कलम २०५ अन्वये घोषित १८ मी. रस्ता. | स.नं. ७८ ते ११९ मधील व इतर उर्वरीत स.नं. मधील क्षेत्र | ४०५०.०० चौ.मी. |
| २ | आ.क्र. ३७१ अ | व्हेजीटेबल मार्केट व शॉपिंग कॉम्प्लेक्स | स.नं.१३५ ते १३६ | ४०००.०० चौ.मी. |
| ३ | आ.क्र. ३६१ अ | उदयान | २१ पैकी | १५००.०० चौ.मी. |
| ४ | १२ मी. रस्ता | नदीकडील १२.०० मी.रस्ता (one nation road) | २३ पैकी व २५ पैकी | १०००.०० चौ.मी. |

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथे कलम २०५ अन्वये घोषीत १८ मी. रस्ता असुन सदर रस्त्यापासून २० मी. डी.पी. रस्त्यापर्यंत रस्ता जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर स.नं. ६१,६२,६३ मधुन १८ मी. रस्ता कलम ३७ अन्वये घोषीत करणेस तसेच सदर कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यास मा.महापलिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५९०　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- ७

दिनांक- २०/१/२०२१　　　　　　　　　　　　विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१५/१६८/२०२० दि.०२/११/२०२०
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.२
दि.९/१२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाचे आदेशक्र.टीपीएस।१८९३। १२७६ ।सीआर ।१९४।९३।युडी-१३, दि.१८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर करणेत आली आहे. मौजे पिंपरी वाघेरे येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. / सि.स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | सुधारित मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | सं.न. २२४ ते २२९ यामधिल सि.स.नं. १११०, १११९/१३ ते १११९/१६ ११६५, ११७०, ११८५, १२५४, १२६७/२ ते १२६७/५, १२६८, १२६८/१,१२६८/२, | ३०००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी वाघेरे येथील खालील नमुद मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित रस्ते व आरक्षणे नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणे व भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

१) पवना नदी लगत स.नं. ३११ ते ३२२, इत्यादी पर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता.

२) पवना नदी कडील स.नं. २,३,४ ते ११ इत्यादी पर्यंत मंजुर विकास योजनेतील १५ मी. दक्षिण-उत्तर रस्ता.

३) स.नं.१,२ इत्यादी मधील आ.क्र.१६२, खेळाचे मैदान

तसेच मौजे आकुर्डी येथील ६०.०० मी. रस्त्याने बाधीत होणा-या आंबेडकर नगर येथे सुमारे २६० घरे (झोपडपट्टी) आहेत सदर झोपडट्टीच्या दोन्ही बाजुस पुर्ण क्षमतेचा रस्ता विकसीत आहे. या झोपडपट्टीमुळे वाहतुकीच्या रहदारीस अडथळा होत असलेने, सदर बाधितांचे पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर बाधितांचे पुर्नवसन केल्यास ६०.०० मी. रस्ता संपुर्ण खुलासा होऊन वाहतुकीचा अडथळा कमी होईल.

तरी सदर रस्ता बाधीतांचे पुर्नवसन मौजे आकुर्डी येथील ताब्यात आलेल्या आरक्षण क्र. २६८ बेघरांसाठी घरे (HDH साठी आरक्षीत असणारा भुखंड) यामध्ये होणेस व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळेगुरव येथील स.नं. ५१ मधील मंजूर विकास योजनेतील प्रस्तावीत १८ मी. रुंद उर्वरित रस्ता नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणे व भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्याचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे/संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|
| १ | १८ मी.रस्ता | स.नं. ७८ ते ११९ मधील कलम २०५ अन्वये घोषित १८ मी. रस्ता. | स.नं. ७८ ते ११९ मधील व इतर उर्वरीत स.नं. मधील क्षेत्र | ४०५०.०० चौ.मी. |
| २ | आ.क्र. ३७१ अ | व्हेजीटेबल मार्केट व शॉपिंग कॉम्प्लेक्स | स.नं.१३५ ते १३६ | ४०००.०० चौ.मी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | आ.क्र. ३६१ अ | उदयान | २१ पैकी | १५००.०० चौ.मी. |
| ४ | १२ मी. रस्ता | नदीकडील १२.०० मी.रस्ता (one nation road) | २३ पैकी व २५ पैकी | १०००.०० चौ.मी. |

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथे कलम २०५ अन्वये घोषीत १८ मी. रस्ता असुन सदर रस्त्यापासून २० मी. डी.पी. रस्त्यापर्यंत रस्ता जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर स.नं. ६१,६२,६३ मधुन १८ मी. रस्ता कलम ३७ अन्वये घोषीत करणेस तसेच सदर कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यास मा.महापलिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ८

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.मा.वैशाली घोडेकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.
**२)** मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५ दि.९/१२/२०२०

पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ व PCSSIHDP अंतर्गत गांधीनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणेकामी मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd.

यांची नेमणूक करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७१२२ दि.२७/०५/२०२० मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन दि.०७/०९/२०२० रोजी मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd. यांना विषयांकित काम करणेस कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सल्लागार यांनी दि.१४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे Draft Concept Report व Conceptual Design सादर केलेले आहे. सदर Draft Concept Report व Conceptual Design नुसार गांधीनगर पुनर्वसन प्रकल्पाची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

- विषयांकित पुनर्वसन प्रकल्प SRA कडील नियमावलीनुसार राबविण्यात येणार आहे.
- मशाल यांचेकडील २००२ चे सर्व्हेनुसार अस्तित्वात असलेल्या झोपडयांची संख्या– १४५०
- गांधीनगर झोपडपट्टीचे क्षेत्र - ६२७१४.३० चौ.मी.
- पुनर्वसनासाठी विचारात घेतलेल्या(Google Map व Land Potential नुसार)=२०३२ सदनिका
- विक्रीसाठी बांधावयाच्या सदनिकांची संख्या- रहिवाशी ४७६ सदनिका+३४४ वाणिज्य सदनिका
- पुनर्वसनासाठी बांधकाम दर र.रु.३३६० प्रति चौ.फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१०० प्रति चौ.फुट Super Built up area
- विक्रीसाठीचा बांधकाम दर- र.रु.३५६० प्रति चौ.फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१०० प्रति चौ.फुट Super Built Up Area

- पुनर्वसनासाठी वापरण्यात येणारा F.S.I.-३.०
- बिल्डींगची उंची – ४० मी. पुनर्वसनासाठी, ७० मी. विक्रीसाठी
- पुनर्वसनाच्या जागा मालकांचा मोबदला- ५०% पर्यंत(Ready Reckoner)
- पुनर्वसनाच्या सदनिकेचे क्षेत्रफळ – ३०० चौ.फुट चटई क्षेत्र
- विक्रीसाठी क्षेत्रफळ ४५० चौ.फुट ते ६०० चौ.फुट चटई क्षेत्र
- प्रकल्पासाठी एकूण बांधकाम खर्च- र.रु.३८३.६१ कोटी
- सद्य:स्थितीत प्रकल्प किंमत र.रु.५०७.९० कोटी(Encroached Area समाविष्ठ करुन)
- लाभार्थ्यांना ट्रान्झिट कॅम्प व त्यासाठीच्या सुविधा मोफत पुरविणेत येणार
- ट्रान्झिट साठी स्थलांतरित करणेत येणा-या लाभार्थ्यांसाठी विकसकामार्फत घर भाडयाची लाईट, पाणीसह / तात्पुरत्या निवा-याची/पत्राशेडची अथवा रोख रकमेबाबतची सुविधा देणेत येणार आहेत.
- सुविधा क्षेत्र(HIKES) विकसकाने विकसित करावयाचे आहे.

- सदर प्रकल्पाची मुदत कामाचे आदेश झाल्यापासून ५ वर्ष राहील व सल्लागाराने विहीत मुदतीत प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील.

गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसन/पुर्ननिर्माण प्रकल्पातील सदनिकांची माहिती

| अ क्र . | | इमारती | | | सदनिका | | | | सुविधा (चौ.फुट) | एकूणक्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | मजले | संख्या | रहिवाशी | क्षेत्रफळ (चौ.फुट) | वाणिज्य | बालवाडी, वेल फेयर सेंटर इ. | | |
| १ | पुनर्वसनासाठी बांधकाम | ३ | ११ | ५ | १८२९ | ३०० | २०३ | ९० | ४३०५६ | १०९३७५४ |
| २ | विक्री साठीचा बांधकाम | २ | २० | ३ | ४७६ | ४५० चौ.फुट ते ६०० चौ.फुट | ३४४ | | | ५७३५९२ |
| ३ | टी.डी.आर | | | | | | | | | २६१५७५० |
| | | | | ८ | २३०५ | | ५४७ | ९० | ४३०५६ | |

तरी गांधीनगर येथील झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणेकामी येणा-या प्रकल्प किंमत र.रु.५०७.९० कोटी व सदर प्रकल्पा पंतप्रधान आवास योजना घटक क्र.१ अंतर्गत राबविणेकरिता जागेवर मनपाचे विविध आरक्षण असलेमुळे जागा मालकास जागा ताब्यात घेणेकामी मोबदला घावा लागणार आहे. त्यासाठी अंदाजे र.रु.१०० कोटी खर्च अपेक्षित आहे. तरी प्रकल्पाच्या Concept & Feasibility Report ला मान्यता तसेच त्यानुसार विस्तृत प्रकल्प आराखडा (DPR) तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५९१ विषय क्रमांक- ८

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.मा.वैशाली घोडेकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.
**२)** मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५
दि.९/१२/२०२०

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्था/बी.आर.टी.एस/९८९/२०२०
दि.२३/१२/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बीआरटीएस विभागामार्फत भक्ती– शक्ती चौक निगडी येथे उड्डाणपूल व ग्रेडसेपरेटर बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पामधील उड्डाणपुलाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच सदर पुल वाहतुकीसाठी खुला करणेत आलेला आहे. सद्यस्थितीत रोटरी व ग्रेड सेपरेटरचे काम पुर्णत्वाकडे आहे. प्रकल्प चालू करण्यापुर्वी प्रकल्पास नाव देणेच्या दृष्टीने मा. “फ” प्रभाग समिती ठराव क्र. ०४ दि.०४/०६/२०१८ अन्वये सदर उड्डाण पुलाचे नाव “जगदगुरू संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज (भक्ती – शक्ती)” देण्याचा ठराव मंजुर करणेत आलेला आहे. सोबत ठरावाची प्रत जोडली आहे. तथापि मनपा कार्यक्षेत्रातील प्रकल्पांना नाव देणेपुर्वी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर ठरावाचे अनुषंगाने उड्डाणपुलाला “जगदगुरू संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज (भक्ती–शक्ती)” उड्डाणपुल याप्रमाणे नाव देणेचा प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग क्र. ८ मधील से.नं. १० मधील नालापार्कला कुठलेही नाव नाही. नालापार्क नाव नसल्यामुळे लक्षात येत नाही. से.१० मधील नालापार्कला स्वर्गीय मीनाताई कामतेकर नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.जयश्री गावडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- ह प्रभाग क्र. ३० कासारवाडी आरक्षण क्र. २२ सर्व्हे नं. ४९७/अ येथे मनपाने नव्याने खेळाचे मैदान विकसीत केलेले सदर मैदानासाठी ह प्रभाग स्थापत्य विभागाकडून प्रवेशद्वार कमानीचे काम करणेत आले आहे. सदर कमानीस मा.ह प्रभाग समिती ठराव क्र. १९ दि.६/२/२०२० अन्वये कै.संजयकुमार सदाशिव लांडगे (मूर्तीकार) नाव देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपळेगुरव येथील विकसीत उदयानाला ह.भ.प."बट्टूराव (आप्पा) गेणूजी जगताप" असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर सिध्दीविनायक मंदिर बर्ड व्हॅली शेजारील रिकामा भुखंड आहे त्याचे प्रवेशद्वारावर "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" असे नामकरणेस करण्यास मान्यता देणेत यावी.

१. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 4 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

२. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 3 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "स्वर्गीय प्रमोदजी महाजन उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

३. प्रभाग क्रमांक ११ मधील शिवाजीपार्क येथील जॉगर्स पार्क व मैला शुध्दीकरण केंद्र येथील महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

४. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 1 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास " श्री सिध्दीविनायक उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

५. मौजे मोशी येथील सार्वजनिक गट नं. ३१०, ३१३, ३१४ मधील जागेमध्ये मनपाचे उद्यान विकसीत करणे बाबत आरक्षण पडले असून सद्यस्थितीमध्ये त्यास विकसीत करणे कामी मनपाने ठराव केला आहे. तरी सदर जागेवरील उद्यानास “कुदळे गार्डन” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मौजे वाकड येथील सार्वजनिक गट नं. ७, १६० मधील हायवे सबवे रस्त्याला कै.ह.भ.प.मनोहरतात्या सोपाना भुजबळ तसेच वाकड येथील मनपा शाळा क्र. ५७/१ व ५७/२ यास कै.तुकाराम नाना कलाटे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५९२ विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्था/बी.आर.टी.एस/९८९/२०२० दि.२३/१२/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बीआरटीएस विभागामार्फत भक्ती– शक्ती चौक निगडी येथे उड्डाणपूल व ग्रेडसेपरेटर बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पामधील उड्डाणपुलाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच सदर पुल वाहतुकीसाठी खुला करणेत आलेला आहे. सद्यस्थितीत रोटरी व ग्रेड सेपरेटरचे काम पुर्णत्वाकडे आहे. प्रकल्प चालू करण्यापुर्वी प्रकल्पास नाव देणेच्या दृष्टीने मा. “फ” प्रभाग समिती ठराव क्र. ०४ दि.०४/०६/२०१८ अन्वये सदर उड्डाण पुलाचे नाव “जगदगुरू संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज (भक्ती – शक्ती)” देण्याचा ठराव मंजुर करणेत आलेला आहे. सोबत ठरावाची प्रत जोडली आहे. तथापि मनपा कार्यक्षेत्रातील प्रकल्पांना नाव देणेपुर्वी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर ठरावाचे अनुषंगाने उड्डाणपुलाला “जगदगुरू संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज (भक्ती–शक्ती)” उड्डाणपुल याप्रमाणे नाव देणेचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ८ मधील से.नं. १० मधील नालापार्कला कुठलेही नाव नाही. नालापार्क नाव नसल्यामुळे लक्षात येत नाही. से.१० मधील नालापार्कला स्वर्गीय मीनाताई कामतेकर नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच ह प्रभाग क्र. ३० कासारवाडी आरक्षण क्र. २२ सर्व्हे नं. ४९७/अ

येथे मनपाने नव्याने खेळाचे मैदान विकसीत केलेले सदर मैदानासाठी ह प्रभाग स्थापत्य विभागाकडून प्रवेशद्वार कमानीचे काम करणेत आले आहे. सदर कमानीस मा.ह प्रभाग समिती ठराव क्र. १९ दि.६/२/२०२० अन्वये कै.संजयकुमार सदाशिव लांडगे (मूर्तीकार) नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपळेगुरव येथील विकसीत उदयानाला ह.भ.प."बट्टूराव (आप्पा) गेणूजी जगताप" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर सिध्दीविनायक मंदिर बर्ड व्हॅली शेजारील रिकामा भुखंड आहे त्याचे प्रवेशद्वारावर "स्वातंञ्यवीर विनायक दामोदर सावरकर" असे नामकरणेस करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच

१. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 4 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 3 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "स्वर्गीय प्रमोदजी महाजन उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

३. प्रभाग क्रमांक ११ मधील शिवाजीपार्क येथील जॉगर्स पार्क व मैला शुध्दीकरण केंद्र येथील महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास "डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

४. प्रभाग क्रमांक ११ मधील पुर्णानगर येथील CDC 1 या भूखंडामध्ये महानगरपालिकेच्या उद्यानाचे कामकाज सुरु आहे. सदर उद्यानास " श्री सिध्दीविनायक उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

५. मौजे मोशी येथील सार्वजनिक गट नं. ३१०, ३१३, ३१४ मधील जागेमध्ये मनपाचे उद्यान विकसीत करणे बाबत आरक्षण पडले असून सद्यस्थितीमध्ये त्यास विकसीत करणे कामी मनपाने ठराव केला आहे. तरी सदर जागेवरील उद्यानास "कुदळे गार्डन" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे वाकड येथील सार्वजनिक गट नं. ७, १६० मधील हायवे सबवे रस्त्याला कै.ह.भ.प.मनोहरतात्या सोपाना भुजबळ तसेच वाकड येथील मनपा शाळा क्र. ५७/१ व ५७/२ यास कै.तुकाराम नाना कलाटे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५९३ विषय क्रमांक- १०

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/१/कावि/५३४/२०२१ दि.०७/०१/२०२१

मनपाचे प्रभाग क्रमाक १४ मधिल मनपाचे निगडी चौक येथील अस्तित्व मॉल मध्ये स्मार्ट सिटी कार्यालय कार्यान्वित करणेत आलेले आहे. सदर ठिकाणी मराविवि कंपनी मार्फत त्यांचे प्राधिकरण सब स्टेशन येथुन पर्यायी उच्चदाब वीज पुरवठा जोडणेचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेणेचे प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तथापी सदर काम हे अचानक उद्भवले मुळे सदर कामाचा समावेश सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात नाही. तसेच सदर कामाकरीता सन २०२०-२१ मध्ये तरतूद उपलब्ध नाही. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असुन त्याकरीता सदर कामाचे नांव सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी " वॉर्ड क्र.१४ स्मार्ट सिटी कार्यालयाकरीता पर्यायी उच्चदाब वीज पुरवठा करणे व विद्युत विषयक कामे करणे " ह्या कामाचा समावेश सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात करून सदर कामाकरीता खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पानांक | अ. क्र. | अंदाजपत्रकीय तरतूद (रक्कम) | सन २०२० - २०२१ ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ९ (नवीन प्रभाग क्र १०) संभाजीनगर | उद्याने | ४१२ | १ | २००००००० | ८४८००००० | ० | ७०००००० | ७७८००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | येथील बर्ड व्हॅली येथे लेझर शो करिता आवश्यक कामे करणे. | | | | | | | | |
| २ | वॉर्ड क्र. १४ स्मार्ट सिटी कार्यालयाकरीता पर्यायी उच्चदाब वीज पुरवठा करणे व विद्युत विषयक कामे करणे | उच्च व लघुदाब पोल व तारा हलविणे | ४२२ | १३ | २०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० |
| | | | | | **एकूण** | ८४८००००० | ७०००००० | ७०००००० | ८४८००००० |

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपल्याकडे अशी प्रथा आहे की ज्या भागात जो निधी आहे त्याच त्या भागातच वर्गीरण व्हाव अशी आजपर्यंतची प्रथा होती. आज प्रभाग क्र. ९ मधला ७० लाखाचा निधी दुसरीकडे कुठेतरी नेणार आहेत. मध्यंतरी आयुक्त साहेबांकडे एक फाईल नेली होती त्याच्यामध्ये त्यांनी असं सांगीतल की सिटी ईंजिनीअरनी याचा खुलासा करावा की याच्यामध्ये तरतूद करता येणार आहे का. आयुक्त साहेब तुम्ही असं मनानी करु शकता की बर्ड व्हॅलीमध्ये आता खर्च होणार नाहीए मग तीथ करा मग त्या फाईलवरही तुम्ही तसं करायला पाहीजे होतं. कमीत कमी ज्या प्रभागाचा निधी आहे त्याच प्रभागामध्ये तो वर्गीकरण झाला पाहीजे, पुर्वी तसं होत होतं. आज आमच्या वॉर्डमध्येही तीन नगरसेवक बीजेपीचे आहेत, एवढीतरी दक्षता घ्यायला पाहीजे होती की आमच्या वॉर्डातला निधी कमीत कमी आमच्या वॉर्डात वर्गीकरण करा. ते न होता त्या फाईलमधला रिमार्क बघता आणि दुसरीकडे मात्र वर्गीकरण करणार आहेत. आयुक्त साहेब मला असं वाटत की कमीत कमी तुम्ही येथून पुढ तुम्ही या गोष्टीची दक्षता घ्यावी की ज्या वॉर्डातील निधी आहे त्या वॉर्डातील लोकाना विश्वासात घ्याव. मला माहीती आहे की याचा अर्थ मी असं समजणार की तीन नगरसेवकानी तुम्हांला निधी वर्गीकरणासाठी परमीशन दिलेली आहे. पण माझ काम आहे की याला विरोध करणं, याला माझा विरोध आहे. ज्या वॉर्डातील निधी आहे त्या वॉर्डातच तो वापरावा. आमच्या वॉर्डातील निधी दुसऱ्या वॉर्डात वापरणार असालतर माझा या गोष्टीला विरोध आहे. आयुक्त साहेब तुमच पत्र आहे. मला

माहीती आहे हा जरी निधी तुम्ही इकडे घेतलातरी दुसरा तुम्ही आम्हांला देवू शकता म्हणून आता मी सौम्यपणे सांगते की तुम्ही येथून पुढे काम करताना ज्या वॉर्डातील निधी आहे त्याच वॉर्डात वापरावा. अन्यत: मी असं आता म्हणते की आमच्या वॉर्डात तीन नगरसेवक जरी भारतीय जनता पक्षाचे असलेतर त्यांच्या संम्मतीने हा विषय झालेला आहे. म्हणजे चांगल्या प्रोजेक्टचा निधी दुसरीकडे वर्ग करता ही चुकीची प्रथा आहे अशी प्रथा येथून पुढे पाडू नये अशी माझी आयुक्त साहेब तुम्हाला विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मता टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.योगीता नागरगोजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ११

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/०६/२०२१ दि.०७/०१/२०२१

मौजे तळवडे त्रिवेणीनगर या ठिकाणी स्पाईन रोडचे उर्वरीत काम करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. त्या करीता या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या मिळकत धारकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. सदर मिळकतधारकांचे पुनर्वसन करणेकामी नवनगर विकास प्राधिकरणांतर्गत प्रभाग क्र.८ मधील पेठ क्र.११ येथील भूखंड मनपाकडे हस्तांतरीत करणेत आलेला आहे. तसेच सदर भूखंडातील लेआऊट देखील मंजूर करण्यात आलेला आहे. सदर भूखंडामधील रहिवाशांसाठी विद्युतविषयक पायाभूत सुविधा पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत विकसित करावयाचे आहेत. सदर ठिकाणी स्थापत्य विषयक कामे बी.आर.टी.एस. विभागामार्फत करणेत येत आहेत. सदर ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी विषयांकीत कामाचा महापालिकेच्या अंदाजपत्रकात नव्याने समावेश करुन त्यास खालील तक्त्यानुसार प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | अंदाजपत्रक पानांक व अनु. | प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ तरतूद | वाढ | घट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिवेणीनगर चौक तळवडे येथील स्पाईन रस्त्याने बाधीत मिळकत धारकांचे पुनर्वसन प्रभाग क्र. ८ मधील पेठ क्र. ११ येथे करणेत येत असलेल्या ठिकाणी ले आऊट मधील अंतर्गत रस्ते विकसित करणे व सुविधा पुरविणेसाठी विद्युतविषयक कामे करणे. | स्थापत्य प्रकल्पां-तर्गत विद्युत विषयक कामे क प्रभाग | | १००००००० | ० | ५००००० | ० | ५००००० |
| २ | त्रिवेणीनगर चौक, तळवडे येथील स्पाईन रस्त्याने बाधित मिळकतधारकांचे पुनर्वसनासाठी लेआऊट मधील अंतर्गत रस्ते विकसित करणे व सुविधा पुरविणे. | स्थापत्य विशेष योजना | ५९/ १४८ | १०००००००० | ३४५८००० | ० | ५००००० | २९५८००० |

सबब सदर काम अंदाजपत्रकातील विद्युत विभागाचे ‘क’ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत “स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक काम करणे” या लेखाशिर्षावर नव्याने समावेश करणेकामी तसेच या कामाकरीता वर नमूद केलेप्रमाणे आवश्यक प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

**मा.सुवर्णा बुर्डे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरामधील प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात स्थापत्य विषयक व विद्युत विषयक कामे करणेबाबत मागणी होत आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करून रक्कम रुपये ४.०० कोटी यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पानांक | अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२०-२०२१ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात स्थापत्य विषयक व विद्युत विषयक कामे करणे | स्थापत्य उद्यान | - | - | - | ४००००००० | ० | २००००००० | - | २००००००० |
| २ | भूसंपादन निधी (नगररचना) | - | ३४२ | ३ | - | - | १५०००००००० | - | २००००००० | १४८००००००० |
| | एकुण | | | | | ४००००००० | १५०००००००० | २००००००० | २००००००० | १५०००००००० |

तसेच पिंपरी चिंचवड शहरामधील प्रभाग क्र.२६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात विरगुंळा केंद्र बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत मागणी होत आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करून रक्कम रुपये ८० लाख यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पानांक | अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२०-२०२१ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात विरगुंळा केंद्र बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उद्यान | - | - | - | ८०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| २ | भूसंपादन निधी (नगररचना) | - | ३४२ | ३ | - | - | १५०००००००० | - | ५०००००० | १४९५०००००० |
| | एकुण | | | | | ८०००००० | १५०००००००० | ५०००००० | ५०००००० | १५०००००००० |

तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करून त्यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. अक्र. | सन २०२०-२१ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आरक्षण क्र.१/८८(अ) येथे ८५० बेडचे हॉस्पिटल विकसित करणे. | ३५०.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | - | ५०.०० लाख | ५०.०० लाख | - | ५०.०० लाख |
| २ | बोपखेल फाटा ते दिघी जकात नाका पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण करून मजबुतीकरण करणे. | ८३.०० कोटी | UTF | ६४१/३६ | ४.०० कोटी | - | ५०.०० लाख | ३.५० कोटी |
| | एकूण | | | | | ५०.०० लाख | ५०.०० लाख | ४.०० कोटी |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.७ येथील खालील नविन विकास कामे सन २०२०-२१ च्या मनपाच्या अंदाजपत्रकात समावेश करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र ७.येथील फुगे माने तालीम येथे नवीन अद्यावत इमारत बांधणे. | ३००००००० |

तसेच सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

| अ.क्रं. | कामाचे नांव | सन २०२०-२१ मधील मूळ अंदाजपत्रकातील पानांक /क्रमांक | सन २०२०-२१ मधील मूळ अंदाजपत्रकातील अंदाजपत्रकीय रक्कम (प्रशासकिय मान्यता) रक्कम रूपये | सन २०२०-२१ अंदाजपत्रकामध्ये करावयाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम (सुधारीत प्रशासकिय मान्यता) रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| | लेखाशिर्ष मुंबई पुणे रस्ता विद्युत – स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्युत कामे - | | | |
| १. | भक्तिशक्ती चौक येथे ग्रेड - | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेपरेटर व उड्डानपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युतविषयक कामे करणे | ४६७/५ | ३,००,००,०००/- | ४,५०,००,०००/- |

वर नमूद केलेल्या कामाकरीता र.रू. ४,५०,००,०००/- या रक्कमेस सुधारीत प्रशासकिय मान्यता देणेत यावी. तसेच ॲटोक्लस्टर येथे उभारणेत येणा-या जंम्बो रुग्णालयाकरिता वातानुकुलित यंत्रणा बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेचे काम मनपाचे आकुर्डी रुग्णालयाचे विस्तारिकरण करणे टप्पा १ व २ अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे याकामातून करणेस मान्यता देणेत यावी. कोविड–१९ महामारीचे नियंत्रणाकरिता व कोविड रुग्णांना तत्परतेने वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेकरिता अँटोक्लस्टर येथील हॉल ए व बी मध्ये जंम्बो रुग्णालय तयार करणेचे नियोजन करणेत आले होते, तथापि सदर रुग्णालयाचे विद्युतीकरण करणे, वातानुकुलन यंत्रणा बसविणे ह्या कामाकरिता निविदा मागवून काम करणेसाठी पुरेसा अवधि उपलब्ध नसल्याने तसेच कोविड–१९ मुळे सर्वत्र लॉकडाउन असल्यामुळे व सदरचे काम अति.तातडीचे असल्याने ते मनपाचे आकुर्डी रुग्णालयाचे विस्तारिकरण करणे टप्पा १ व २ अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे, निविदा क्र.१/७७/१-२०१६-१७ व निविदा क्र.५३/२-२०१८-१९ ह्या चालू कामातून तातडीने अत्यावश्यक बाब म्हणून कामाचे जागेत बदल करुन काम पुर्ण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाचे महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पवनाथडी जत्रेचे नियोजन पी.डब्लू.डी.मैदान, सांगवी येथे मार्च दि.०४.०३.२०२० ते दि.०८.०३.२०२० या कालावधीत आयोजित करणेत आलेले होते. सदर कार्यक्रमाकरीता झालेल्या एकुण र.रू. ९७,३६,७४६/- चे खर्चास मा. स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक – ७६०७ दि. १४/१०/२०२० नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर कार्यक्रमांकरिता खालीलप्रमाणे विभागानुसार खर्च झालेला आहे.

| अक्र. | विभागाचे नाव | खर्चाचा तपशील | झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य विभाग, ह क्षेत्रिय कार्यालय. | मंडप व्यवस्था व स्टॉल उभारणे. | ४२,९१,१८४/- |
| २. | विद्युत विभाग,ह क्षेत्रिय कार्यालय. | विद्युत व्यवस्था. | ३८,८३,५६२/- |
| ३. | माहिती व जनता संपर्क | सांस्कृतिक कार्यक्रम. | १३,६५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | विभाग. | | |
| ४. | सुरक्षा विभाग व अग्निशामक विभाग. | सुरक्षा व्यवस्था, पार्किंग व्यवस्था,अग्निशामक व्यवस्था. | १,९७,०००/- |
| | एकूण | | ९७,३६,७४६/- |

सदर एकुण र.र. ९७,३६,७४६/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.३ मोशी च-होली येथील सैनिक कॉलनी, सिध्दीविनायक नगर येथे मनपाचे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था नसल्याने तसेच भौगोलीकदृष्ट्या पाण्याची पाईपलाईन टाकणेस अडचण आहे. त्यासाठी सदर भागात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात या कामाचा समावेश नाही. तरी, मंजूर अंदाजपत्रकातील महसूली कामामधून अनुक्रमांक २६, पान क्र.८६६ " ई प्रभागत ठिकठिकाणी जुनी वापरात नसलेली टाकी पाडणे व इतर अनुषंगिक दुरूस्ती विषयक कामे करणे." या कामाची मुळ तरतूद रक्कम रू.१६,००,०००/- पैकी रक्कम रू.१५,००,०००/- या कामास वर्ग करणेस मान्यता देण्यात यावी व अनुक्रमांक २८, पान क्र.८६६ "ई प्रभागात प्रभाग क्र.३,४,५ व ७ मधील विद्युत पंप व अनाधिकृत कनेक्शन तोडण्यासाठी मजूरासह यंत्रणा पुरविणे." या कामाची मुळ तरतूद रक्कम रू.१६,००,०००/- पैकी रक्कम रू.१५,००,०००/- या कामास वर्ग करणेस मान्यता देण्यात यावी. (एकूण रक्कम रू.३०,००,०००/-) तसेच अंदाजपत्रकीय रक्कम रू.४५,००,०००/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच महापालिका अंदाजपत्रक २०२०-२१ मध्ये खालील कामाचा समावेश नजर चुकीने राहीला होता, तरी कामाचा समावेश अंदाजपत्रक पुस्तकामध्ये करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मधील रस्ते अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे | ५००००००० | ४१५५८३९६ |

तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे व सदर कामांमध्ये विद्युत विषयक कामे करण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे वाढीव प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व त्या अंतर्गत विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व फर्निचरची कामे करणे (टप्पा-२) | ६० | १० | १२०००००० | १७०००००० |
| २ | प्रभाग क्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकर वाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे | ३० | २४ | ३०००००००० | ३६०००००० |
| | एकुण | | | ३१२०००००० | ३७७०००००० |

तसेच पिंपरी येथील कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील इमारतीमध्ये मे.कोर्टासाठी फर्नीचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२२ दिनांक २० जून २०१९ अन्वये रक्कम रु. ५ कोटी चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचे अंदाजपक सन २०१९-२० च्या राज्यस्तरीय दरपत्रका प्रमाणे तयार करणेत आलेले होते. त्यास अनुसरुन पिपरी नेहरुनगर येथील स.नं. १०९,११० व सि.स.नं. ६३६५, ६३६६, ६३६७, ६३७०, ६३७२ मधील कै. अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील मनपाच्या ताब्यातील संपुर्ण इमारत मे. कोर्टास भाडेतत्वावर देणेकामी मा. जिल्हा न्यायाधिश-६, पुणे यांनी मागणी केलेप्रमाणे आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषय कामे करणेबाबत निविदा प्रसिध्द करणेत आली होती. तथापि, कोव्हीड-२०१९ (कोरोना) महामारीमुळे मे. कोर्टासाठी आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषयक कामे यासाठी लागणारा खर्च एकूण मूल्यांकनामध्ये समाविष्ठ करुन भाडे अदा करणेबाबत मे. कोर्टाची मान्यता

प्राप्त न झालेमुळे व मनपा मार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या निवीदेचा वैधता कालावधी समाप्त झालेमुळे सदरची निवीदा रद्द करावी लागली.

मौजे पिंपरी-वाघेरे येथील स.नं. १०९,११० व सि.स.नं. ६३६५, ६३६६, ६३६७, ६३७०, ६३७२ मधील कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील मनपाच्या ताब्यातील संपुर्ण इमारत मे. कोर्टास भाडेतत्वावर देणेकामी आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषय कामे (सन२०१९-२० चे अंदाजपत्रकातील पा.क्र. ७९, अ.क्र.८६) करणेसाठी नविन निवीदा सन २०२०-२१ च्या राज्यस्तरीय दरपत्रकाप्रमाणे प्रसिध्द करणे आवश्यक असुन या कामासाठी रक्कम रु. ७.५० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.योगीता नागरगोजे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५९४ विषय क्रमांक- ११

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/०६/२०२१ दि.०७/०१/२०२१

मौजे तळवडे त्रिवेणीनगर या ठिकाणी स्पाईन रोडचे उर्वरीत काम करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. त्या करीता या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या मिळकत धारकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. सदर मिळकतधारकांचे पुनर्वसन करणेकामी नवनगर विकास प्राधिकरणांतर्गत प्रभाग क्र.८ मधील पेठ क्र.११ येथील भूखंड मनपाकडे हस्तांतरीत करणेत आलेला आहे. तसेच सदर भूखंडातील लेआऊट देखील मंजूर करण्यात आलेला आहे. सदर भूखंडामधील रहिवाशांसाठी विद्युतविषयक पायाभूत सुविधा पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत विकसित करावयाचे आहेत. सदर ठिकाणी स्थापत्य विषयक कामे बी.आर.टी.एस. विभागामार्फत करणेत येत आहेत. सदर ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी विषयांकीत कामाचा महापालिकेच्या अंदाजपत्रकात नव्याने समावेश करुन त्यास खालील तक्त्यानुसार प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | अंदाजपत्रक पानांक व अनु. | प्रशासकीय मान्यता | सन २०२०-२१ तरतूद | वाढ | घट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिवेणीनगर चौक तळवडे येथील स्पाईन रस्त्याने बाधीत मिळकत धारकांचे पुनर्वसन प्रभाग क्र. ८ मधील पेठ क्र. ११ येथे करणेत येत असलेल्या ठिकाणी ले आऊट मधील अंतर्गत रस्ते विकसित करणे व सुविधा पुरविणेसाठी विद्युतविषयक कामे करणे. | स्थापत्य प्रकल्पां-तर्गत विद्युत विषयक कामे क प्रभाग | | १००००००० | ० | ५००००० | ० | ५००००० |
| २ | त्रिवेणीनगर चौक, तळवडे येथील स्पाईन रस्त्याने बाधित मिळकतधारकांचे पुनर्वसनासाठी लेआऊट मधील अंतर्गत रस्ते विकसित करणे व सुविधा पुरविणे. | स्थापत्य विशेष योजना | ५९/ १४८ | १०००००००० | ३४५८००० | ० | ५००००० | २९५८००० |

सबब सदर काम अंदाजपत्रकातील विद्युत विभागाचे ‘क’ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत “स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक काम करणे” या लेखाशिर्षावर नव्याने समावेश करणेकामी तसेच या कामाकरीता वर नमूद केलेप्रमाणे आवश्यक प्रशासकीय मान्यता व तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामधील प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात स्थापत्य विषयक व विद्युत विषयक कामे करणेबाबत मागणी होत आहे.सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करून रक्कम रुपये ४.०० कोटी यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पानांक | अ क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२० - २०२१ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील राजमाता | स्थापत्य उद्यान | - | - | - | ४००००००० | ० | २००००००० | - | २००००००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिजाऊ उद्यानात स्थापत्य विषयक व विद्युत विषयक कामे करणे | | | | | | | | | |
| २ | भूसंपादन निधी (नगररचना) | - | ३४२ | ३ | - | - | १५००००००० | - | २००००००० | १४८००००००० |
| | एकुण | | | | | ४०००००० | १५००००००० | २००००००० | २००००००० | १५००००००० |

तसेच पिंपरी चिंचवड शहरामधील प्रभाग क्र.२६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात विरगुंळा केंद्र बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत मागणी होत आहे. सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करून रक्कम रुपये ८० लाख यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कामासाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पानांक | अ क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता र.रु. | सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०२०-२०२१ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात विरगुंळा केंद्र बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उद्यान | - | - | - | ८०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| २ | भूसंपादन निधी (नगररचना) | - | ३४२ | ३ | - | - | १५००००००० | - | ५०००००० | १४९५०००००० |
| | एकुण | | | | | ८०००००० | १५००००००० | ५०००००० | ५०००००० | १५००००००० |

तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करून त्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन २०२०-२१ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आरक्षण क्र.१/८८(अ) येथे ८५० बेडचे हॉस्पिटल विकसित करणे. | ३५०.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | - | ५०.०० लाख | ५०.०० लाख | - | ५०.०० लाख |
| २ | बोपखेल फाटा ते दिघी जकात नाका पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण करून मजबुतीकरण करणे. | ८३.०० | UTF | ६४१/ ३६ | ४.०० कोटी | --- | ५०.०० लाख | ३.५० कोटी |
| | एकूण | | | | | ५०.०० लाख | ५०.०० लाख | ४.०० कोटी |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र.७ येथील खालील नविन विकास कामे सन २०२०-२१ च्या मनपाच्या अंदाजपत्रकात समावेश करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.येथील फुगे माने तालीम येथे नवीन अद्यावत इमारत बांधणे ७. | ३००००००० |

तसेच सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | सन २०२०-२१ मधील मूळ अंदाजपत्रकातील पानांक /क्रमांक | सन २०२०-२१ मधील मूळ अंदाजपत्रकातील अंदाजपत्रकीय रक्कम (प्रशासकिय मान्यता) रक्कम रूपये | सन २०२०-२१ अंदाजपत्रकामध्ये करावयाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम (सुधारीत प्रशासकिय मान्यता) रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| | लेखाशिर्ष मुंबई पुणे रस्ता विद्युत – स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्युत कामे - | | | |
| १. | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेपरेटर व उड्डानपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युतविषयक कामे करणे | ४६७/५ | ३,००,००,०००/- | ४,५०,००,०००/- |

वर नमूद केलेल्या कामाकरीता र.रू. ४,५०,००,०००/- या रक्कमेस सुधारीत प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. तसेच ॲटोक्लस्टर येथे उभारणेत येणा-या जंम्बो रुग्णालयाकरिता वातानुकुलित यंत्रणा बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेचे काम मनपाचे आकुर्डी रुग्णालयाचे विस्तारिकरण करणे टप्पा १ व २ अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे याकामातून करणेस मान्यता देणेत येत आहे. कोविड–१९ महामारीचे नियंत्रणाकरिता व कोविड रुग्णांना तत्परतेने वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेकरिता अँटोक्लस्टर येथील हॉल ए व बी मध्ये जंम्बो रुग्णालय तयार करणेचे नियोजन करणेत आले होते, तथापि सदर रुग्णालयाचे विद्युतीकरण करणे, वातानुकुलन यंत्रणा बसविणे ह्या कामाकरिता निविदा मागवून काम करणेसाठी पुरेसा अवधि उपलब्ध नसल्याने तसेच कोविड–१९ मुळे सर्वत्र लॉकडाउन असल्यामुळे व सदरचे काम अति.तातडीचे असल्याने ते मनपाचे आकुर्डी रुग्णालयाचे विस्तारिकरण करणे टप्पा १ व २ अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे, निविदा क्र.१/७७/१-२०१६-१७ व निविदा क्र.५३/२-२०१८-१९ ह्या चालू कामातून तातडीने अत्यावश्यक बाब म्हणून कामाचे जागेत बदल करुन काम पुर्ण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पवनाथडी जत्रा २०१९-२० चे कार्यक्रमाकरिता झालेल्या एकूण र.रु.९७,३६,७४६/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाचे महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पवनाथडी जत्रेचे नियोजन पी.डब्लू.डी.मैदान, सांगवी येथे मार्च दि.०४.०३.२०२० ते दि.०८.०३.२०२० या कालावधीत आयोजित करणेत आलेले होते. सदर कार्यक्रमाकरीता झालेल्या एकुण र.रू. ९७,३६,७४६/- चे खर्चास मा. स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक – ७६०७ दि. १४/१०/२०२० नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर कार्यक्रमांकरिता खालीलप्रमाणे विभागानुसार खर्च झालेला आहे.

| अक्र. | विभागाचे नाव | खर्चाचा तपशील | झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य विभाग, ह क्षेत्रिय कार्यालय. | मंडप व्यवस्था व स्टॉल उभारणे. | ४२,९१,१८४/- |
| २. | विद्युत विभाग,ह क्षेत्रिय | विद्युत व्यवस्था. | ३८,८३,५६२/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यालय. | | |
| ३. | माहिती व जनता संपर्क विभाग. | सांस्कृतिक कार्यक्रम. | १३,६५,०००/- |
| ४. | सुरक्षा विभाग व अग्निशामक विभाग. | सुरक्षा व्यवस्था, पार्किंग व्यवस्था,अग्निशामक व्यवस्था. | १,९७,०००/- |
| | एकूण | | ९७,३६,७४६/- |

सदर एकुण र.र. ९७,३६,७४६/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.३ मोशी च-होली येथील सैनिक कॉलनी, सिध्दीविनायक नगर येथे मनपाचे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था नसल्याने तसेच भौगोलीकदृष्ट्या पाण्याची पाईपलाईन टाकणेस अडचण आहे. त्यासाठी सदर भागात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात या कामाचा समावेश नाही. तरी, मंजूर अंदाजपत्रकातील महसूली कामामधून अनुक्रमांक २६, पान क्र.८६६ " ई प्रभागत ठिकठिकाणी जुनी वापरात नसलेली टाकी पाडणे व इतर अनुषंगिक दुरूस्ती विषयक कामे करणे." या कामाची मुळ तरतूद रक्कम रू.१६,००,०००/- पैकी रक्कम रू.१५,००,०००/- या कामास वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे व अनुक्रमांक २८, पान क्र.८६६ "ई प्रभागात प्रभाग क्र.३,४,५ व ७ मधील विद्युत पंप व अनाधिकृत कनेक्शन तोडण्यासाठी मजूरासह यंत्रणा पुरविणे." या कामाची मुळ तरतूद रक्कम रू.१६,००,०००/- पैकी रक्कम रू.१५,००,०००/- या कामास वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे (एकूण रक्कम रू.३०,००,०००/-) तसेच अंदाजपत्रकीय रक्कम रू.४५,००,०००/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये कामाचे नाव समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिका अंदाजपत्रक २०२०-२१ मध्ये खालील कामाचा समावेश नजर चुकीने राहीला होता, तरी कामाचा समावेश अंदाजपत्रक पुस्तकामध्ये करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मधील रस्ते अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे | ५००००००० | ४१५५८३९६ |

तसेच सन २०१९-२० च्या सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अंदाजपत्रकात कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे व सदर कामांमध्ये विद्युत विषयक कामे करण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे वाढीव प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व त्या अंतर्गत विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व फर्निचरची कामे करणे (टप्पा-२) | ६० | १० | १२०००००० | १७०००००० |
| २ | प्रभाग क्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकर वाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे | ३० | २४ | ३०००००००० | ३६०००००० |
| | एकुण | | | ३१२०००००० | ३७७०००००० |

तसेच पिंपरी येथील कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील इमारतीमध्ये मे.कोर्टासाठी फर्नीचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२२ दिनांक २० जून २०१९ अन्वये रक्कम रु. ५ कोटी चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचे अंदाजपक सन २०१९-२० च्या राज्यस्तरीय दरपत्रका प्रमाणे तयार करणेत आलेले होते. त्यास अनुसरुन पिपरी नेहरुनगर येथील स.नं. १०९,११० व सि.स.नं. ६३६५, ६३६६, ६३६७, ६३७०, ६३७२ मधील कै. अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील मनपाच्या ताब्यातील संपुर्ण इमारत मे. कोर्टास भाडेतत्वावर देणेकामी मा. जिल्हा न्यायाधिश-६, पुणे यांनी मागणी केलेप्रमाणे आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषय कामे करणेबाबत निविदा प्रसिध्द करणेत आली होती. तथापि,

कोव्हीड-२०१९ (कोरोना) महामारीमुळे मे. कोर्टासाठी आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषयक कामे यासाठी लागणारा खर्च एकूण मूल्यांकनामध्ये समाविष्ठ करुन भाडे अदा करणेबाबत मे. कोर्टाची मान्यता प्राप्त न झालेमुळे व मनपा मार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या निवीदेचा वैधता कालावधी समाप्त झालेमुळे सदरची निवीदा रद्द करावी लागली.

मौजे पिंपरी-वाघेरे येथील स.नं. १०९,११० व सि.स.नं. ६३६५, ६३६६, ६३६७, ६३७०, ६३७२ मधील कै. अण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील मनपाच्या ताब्यातील संपुर्ण इमारत मे. कोर्टास भाडेतत्वावर देणेकामी आवश्यक फर्नीचर, पार्टीशन्स तसेच इतर अनुषंगिक स्थापत्य व विदयुत विषय कामे (सन२०१९-२० चे अंदाजपत्रकातील पा.क्र. ७९, अ.क्र.८६) करणेसाठी नविन निवीदा सन २०२०-२१ च्या राज्यस्तरीय दरपत्रकाप्रमाणे प्रसिध्द करणे आवश्यक असुन या कामासाठी रक्कम रु. ७.५० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.कमल घोलप -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १२

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचेकडील जा.क्रपअक/०३/कावि/०३/२०२१ दि.११/१/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्व शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापी यावर्षी मार्च २०२० पासून कोविड महामारीमुळे लागू झालेल्या लॉकडाऊन व त्यानंतरच्या प्रतिबंधामूळे सन २०१९-२० च्या पर्यावरण सद्यस्थितीत अहवालासाठी आवश्यक माहिती मनपाच्या व इतर शासकीय – निमशासकीय विभागाकडून वेळेत प्राप्त होऊ शकली नाही. सदरची माहिती प्राप्त करुन घेणेसाठी विलंब होत असल्याने सन २०१९-२० चा

पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करुन मा.महापालिका सभेसमोर ठेवणेस मा.आयुक्त यांचेकडील प्रस्तावानुसार मुदतवाढ घेणेत आली होती. त्यानुसार प्राप्त माहितीच्या आधारे सन २०१९-२० चा मनपाचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तयार केलेला असून सदरचा प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१९-२० चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल नजीकच्या मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत येत आहे.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सचिन चिखले** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. या विषयाला अनुसरुन मी आपल्याला दुसरा विषय सांगतो. आज भक्ती-शक्ती उड्डाणपुलाचं नामकरण झालं, भक्ती –शक्ती “उड्डाणपुलाला जगदगुरु संत तुकाराम महाराज” व “छत्रपती शिवाजी महाराज” ( भक्ती –शक्ती उड्डाणपूल ) असे नामकरण केले आहे. त्याबद्दल सर्व प्रभागातील नगरसेवकांच त्याचबरोबर मा.महापौर,मा.आयुक्त यांचे हार्दीक अभिनंदन करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.तुषार कामठे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आजचा पर्यावरणाचा जो विषय आहे यासंदर्भामध्ये मला मा.आयुक्तांकडनं खुलासा पाहिजे. महापालिकेच्या खर्चाने ३ अभियंत्यांना आपण पर्यावरणाच्या संदर्भातील प्रशिक्षणासाठी पाठविणेत आलेले होते. त्या अभियंत्यांना आपण पर्यावरणाचा पदभार न देता त्यांना नगररचना किंवा बांधकाम विभागाचा पदभार दिलेला आहे. मी या विषयाच्या संदर्भामध्ये दोन वेळेस माहिती मागवली होती. या अभियंत्यांकडनं आपण ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत यामध्ये महापालिकेने पर्यावरण विभाग किंवा वाहतुक विभाग यांच्या शिक्षणासाठी आपण जे पैसे खर्च केले आहेत. ८/८ महिने आपण त्यांना शिक्षणासाठी पाठविले त्यांना ते पद न देता बाकीचेच पदं देत आहोत. त्यासंदर्भात आम्ही माहिती घेतली आहे. तेंव्हा आम्हांला सांगण्यात आलं की, ती लोक ती जागा सोडायला तयार नाहीत. मग आपण त्यांच्या शिक्षणासाठी पैसे कशासाठी घालवले आहेत. याचा खुलासा आयुक्त साहेब आपण द्यावा अशी विनंती करतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मला वाटते हा जो पर्यावरणाचा अहवाल आहे तो प्रत्येकाच्या घरी कधी आला हे मला माहिती नाही. हा अहवाल आपण या शहराच्या,तुमच्या-आमच्या दृष्टीकोनातून तुम्ही वाचला असेल असं वाटत कारण तुम्ही या सभागृहामध्ये पर्यावरणावर बोलू दिलं जात नाही.पर्यावरणामध्ये फक्त एकच विषय नाही त्याच्यामध्ये प्रत्येक पानन पान जर तुम्ही चाळलं तर गेली चार वर्ष या पर्यावरणावर बोलता आलं नाही. पर्यावरण म्हणजे काय? हे आपल्याला समजलं आहे की,नाही हे मला माहिती नाही. पर्यावरणावर आपण सर्वांनी अभ्यास केला गेला पाहिजे. या अहवालाची प्रत मला काल संध्याकाळीच मिळाली मी आज सकाळी सहज त्याच्यामध्ये बघितलं पान नं.६९६ वर तर दहन केलेले प्राणी ६९६ म्हणजे मी सभागृहाला सांगू इच्छिते हे आपल्याला माहीती आहेत का. मग फक्त ६९६ प्राणीच दहन झाले का? कुत्री चावलेल्यांची संख्या १२७५१ मोकाट कुत्री चावलेल्यांची संख्या १२७५१ आहे व दहन केलेले प्राणी ६९६ आहे. याच्यामध्ये पाळीव प्राणी आहेत का,रस्त्यावरची भटकी कुत्री आहेत का? म्हशी आहेत का? बैलं आहेत का? घोडे आहेत का? पर्यावरणाच्या विषयावर सगळयांना अभ्यास करण्याची संधी मिळाली पाहिजे. तुम्हांला या अहवालाचा काही मथित अर्थच कळला नाही तर आम्ही काय बोलणार? माझ्या सहकारी भगिनी पर्यावरणावर अगदी टेबलावर बांगडया घेवून जाणा-या या अहवालावर चर्चा न करता चार वर्ष कशा काय गप्प बसल्या हे मला समजत नाही. माझी मैत्रीण आजपर्यंत कशी काय गप्प बसली आहे हेच मला कळत नाही. का संपल शहरातल पर्यावरण. प्रत्येक शहरामध्ये इंडस्ट्रीज किती आहे आणि या इंडस्ट्रीजमधील पाणी नाल्यामध्ये कशा पध्दतीने सोडले जाते. हे बघा मा.आयुक्त साहेब, आज रात्री जर मला हा अहवाल मिळाला असेल तर मी सकाळी हे पुस्तक कुठंपर्यंत वाचणार आहे आणि कुठपर्यंत नाही हे ही मला कळालेलं नाही. मी माणसांच्या मृत्युचं सांगते रोगराईने मरणा-या मृत्युची आकडेवारी नाही. यामध्ये डेंग्यु,मलेरीया,हृदयविकार कोणाला झाले,पॅरॅलिसीसने किती गेले. कुठल्या, कुठल्या आजाराने किती माणसे गेली याची आकडेवारी त्यांना देता आली नाही. याच्यामध्ये फक्त नैसर्गीक मृत्यु २१४५ झाले आहेत मग बाकीचे मृत्यु झालेच नाहीत का? या अहवालामध्ये अशी माहिती दिलेली आहे की, पुण्याने दिलेल्या माहितीनुसार असे त्याच्या खाली लिहीलेलं आहे.म्हणजे आपण काय केलं आहे, आपण काहीच नाहीना केलं. पिंपरी चिंचवड मध्ये किती कंपन्या आहेत या कंपन्याचे नदयामध्ये फेसयुक्त

पाणी येतं आणि या फेसयुक्त पाण्यामुळे नदीतील मासे मरतात आणि या अशुध्द पाण्यामुळे वनस्पती उगवते. या कंपन्याच्या अशुध्द पाण्याचा त्रास नागरीकांना होणार आहे. पण पर्यावरणामध्ये तशा कंपनीची नावे का दिलेली नाहीत. ज्या कंपन्या अशुध्द पाणी सोडतात त्यांची नांवे या पर्यावरणाच्या अहवालामध्ये का नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या प्रदुषण महामंडळाने आपल्याला दंड केलेला होता. तसेच आपण आळंदी नगरपालिकेला आपण पाणी कशासाठी देतो. आपण आपल्या शहरातील नागरीकांना दिवसाआड पाणी देतो आणि आळंदी नगरपालिकेला आपण पाणी का देतो तर आपल्या परिसरातील कंपन्या या नदीमध्ये अशुध्द पाणी सोडतात म्हणुन आपल्याला शिक्षा म्हणुन आळंदी नगरपालिकेला पाणी द्यावे लागत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेला ही शिक्षा आहे. हवेतील प्रदुषण कमी करण्यासाठी कोणी पुढाकार घ्यायचा आहे. सीएनजीच्या गाडयांची संख्या ८६९ दिलेली आहे. आणि डिझेलच्या गाडयांची संख्या ७४१ दिलेली आहे. प्रत्येक गाडी ही सीएनजीवर का चालत नाहीत. कमिशनरांची गाडी सुध्दा सीएनजीवर आहे की नाही हे पण बघितलं पाहिजे. आणि हे आपणच आपल्या पासून सुरुवात केली पाहिजे. प्रदुषण कमी करण्यासाठी आपण केलं आहे तर फक्त जो कॉन्ट्रॅक्टर आहे त्याच्या कडे असलेल्या ८६९ बसच्या गाडया या सीएनजीवर चालणा-या आहेत आणि काही बस आल्या असतील आपल्या शहरातील प्रदुषण घालवण्यासाठी आपण काय करतोय तर आपण फक्त या बसेसचा वापर आपण केलेला आहे. मा.आयुक्त साहेब,आपण ५/६ वर्षापुर्वी आपण रिक्षावाल्यांना सीएनजी किट बसवण्यासाठी अनुदान दिलं होतं. पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक रिक्षाचालकांनी सीएनजीवर रिक्षा चालवली पाहिजे. यासाठी आपण काय प्रयत्न केलेले आहेत का. या शहरामध्ये सीएनजीवर चालणा-या किती रिक्षा आहेत आणि त्यांना आपण अनुदान दिलेलं आहे का? कुठलेही पब्लिक ट्रान्सपोर्ट असु द्या त्यांनी सीएनजीवर गाडया चालवण्यासाठी आपण प्रयत्न केलेला आहे का? सायक्लोथॉन केलं संपला विषय एक दिवस सायक्लोथॉन केल्याने प्रदुषण संपणार नाही. उपक्रम चांगला आहे मला कोणाच्याही उपक्रमाला नांव ठेवायचं नाही. त्याच्यामधनं जागृती होणार आहे.परंतु यासाठी कॉर्पोरेशनने काय केलं आहे. कॉर्पोरेशनचा लोगो परवाच्या यामध्ये वापरलं गेलं असेल, कातर कॉर्पोरेशनचा लोगो असावा म्हणून पण कॉर्पोरेशनने याच्यासाठी काय केलं आहे. आपण आपल्या महापालिकेच्या शाळेतील लहान मुलांना सायकल देतो मग ही मुले सायकल वापरतात का? पर्यावरणासाठी याचा आपल्याला फायदा होतो का? हे सगळं बघायला पाहिजे. या पर्यावरणाच्या अहवालामध्ये आपण जे

पाणी पितो त्याचा पान क्रमांक ७५ च्या पुढे आहे. हे सुध्दा मला वाचता आलं नाही. जैवीक विवीधता, उदयान ते आहे पान क्र. ९९ वर ते सुध्दा मला वाचता आल नाही. आपण या शहरामध्ये किती उद्याने केली आहेत. यामध्ये जे,जे अधिकारी आहेत ते खुप हुशार आहेत त्यांनाही मला नांवे ठेवायची नाहीत. आजपर्यंत मी कुठल्याही अधिका-याला बांगडयांचा आहेर केलेला नाही आणि मला करायचाही नाही. मला त्यांच्याकडनं काम करुन घ्यायचं आहे आणि त्यांनी चांगल्या पध्दतीने काम करावं,त्यांच आम्ही या सभागृहात कौतुक करावं अशी माझी इच्छा आहे. जैवीक उदयान पिंपरी चिंचवड शहरामध्ये किती केली आहेत याचा खुलासा व्हायला नको का, सभागृहात सगळयांना कळायला नको का. या शहरामध्ये उदयान विभागाने ऑक्सीजनची लेवल वाढण्यासाठी किती झाडे लावलेली आहेत. आणि ही झाडे उदयान विभागाने लावली आहेत का? पर्यावरण विभागाने लावली आहेत हे समजलं पाहिजे. त्यासाठी मा.महापौर साहेब,हा विषय अत्यंत महत्वाचा आहे यावर सविस्तर चर्चा होण्यासाठी विषय तहकुब ठेवणेत यावा अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करते.

**मा.राहुल कलाटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मंगलाताईंनी बरोबर सांगितलं आहे की, आमच्यापर्यंत तर हा अहवाल पोहचला पण नाही. हा अहवाल काल रात्री कोणाला दिले, कोणाला डिस्ट्रीब्युट केले खरं तर हा एक संशोधनाचाच एक विषय आहे. आयुक्त साहेब,मी तुम्हांला वाकडच्या एसटीपीचे बरेच वेळा फोटो पाठवले होते. वाकडच्या गार्डनमध्ये दरवर्षी मैलाचं सगळंच्या सगळं पाणी त्या गार्डनमध्ये असतयं, आमच्याकड पंपींग होवून ते पिंपळेनिलखला जातं. प्रदुषण मंडळाच्या आपल्याला नोटीसा येतात. मला वाटतं आपल्या सगळया विभागानां एकच काम राहीलेलं आहे कामाचे ठेके काढणे, कंन्सलटंट बरोबर फिरणे,त्यातल्याअटी/शर्तीवर लक्ष देणे, हे ओपन सिक्रेट संपुर्ण महापालिकेला माहिती आहे. पक्षनेते आपल्याला जवळ,जवळ पाच वर्ष होत आलेली आहेत. आपण जे काही आता पाहतो आहे ते फक्त कागदावरच दिसुन येत आहे.आम्हांला प्रत्यक्षात कुठं दिसत नाही. मैला तसाच आहे,फेसयुक्त पाणी तसंच नदीत जात आहे. त्यामुळे मासे मृत पावतात. पर्यावरण म्हणजे नेमकं काय आहे.यावर्षी शहरामध्ये कोरोनामुळे लॉकडाऊनच्या काळामध्ये प्रदुषण कमी झालेलं आहे त्याचा शहरावर काय परिणाम झाला त्याचा उल्लेख या अहवालामध्ये असावा आणि तो सर्व नगरसेवकांनी वाचावा. आणि त्यावर चर्चा व्हावी. त्यानंतर हा अहवाल मंजुर

करावा. परंतु याठिकाणी उगाचचं अर्ध्या रात्री अहवाल आणायचा २/४ तासात अहवाल वाचा,अहवाल न वाचता सभागृहात आले तर बरे,घाई-गडबडीत पण मंजुर झाला पाहिजे. आताच तुषारनी सांगितलं आहे की,ज्या कर्मचा-यांवर आपण पर्यावरण आणि वाहतुक विभागाच्या प्रशिक्षणासाठी खर्च केला त्या लोकांना या विभागामध्ये काम का दिलं नाही. त्यांना इतर विभागामध्ये काम का दिलं या सर्व गोष्टीचा उहापोह झाला पाहिजे. पर्यावरण हा महत्वाचा विषय आहे.पर्यावरण कमिटीला तरी माहिती आहे का हा अहवाल म्हणुन, माई हा विषय तहकुब ठेवणेत यावा. सर्व सदस्यांची याठिकाणी मागणी आहे. एक स्वतंत्र मिटींग ठेवुन त्यामध्ये हा विषय आणावा अशी विनंती करतो.

**मा.कुंदन गायकवाड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज आमच्या प्रभाग क्र.१ मधील आमच्या नागरीकांना जो त्रास होत आहे तो म्हणजे आज २० ते २५ दिवस झालं कुठल्या कंपनीच अँसिड सारखे पाणी प्यायला भेटत आहे. या २५ दिवसामध्ये कुठल्या कंपनीचे पाईप लिकेजमधनं लिकेज होत आहे ते आपल्या लोकांना सापडत नाही. गायकवाड साहेबांना घेऊन आम्ही पाईपलाईन चेक केली पण कुठे लिकेज आहे ते सापडत नाही. पाईपलाईनमधनं पुर्ण लाल कलरचे पाणी अँसिड सारखे पाणी येत आहे. सोनवणे वस्तीमध्ये जेवढया कंपन्या आहेत या कंपन्याचा सर्व्हे झाला पाहिजे. विहीरीचं,बोअरवेलचं पण पाणी सुध्दा लाल रंगाचं झालेलं आहे. मग लोकांनी पाणी प्यायचं का नाही आणि नागरीकांना टँकरने पाणी द्यायचे म्हणले तर आपल्याकडे टँकर पण नाहीत म्हणुन आपले अधिकारी सांगतात. एवढं करीत असताना आपण आखी नवीन लाईन टाकली आहे त्यादिवशी साहेब तुम्ही चिखली मध्ये केशर गल्लीला आले होते तिथे बैठी घरे असतील त्याठिकाणी संपुर्ण नवीन पाईप लाईन टाकली आहे. दुसरा विषय आहे इंद्रायणी नदीच्या जलपर्णीचा ती सुध्दा काढलेली नाही. याचं टेंडर सुध्दा काढलेलं आहे पण आमच्या इथ एकही जलपर्णी निघालेली नाही. यासंबंधीत जे अधिकारी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करणेत यावी. आणि आमच्याकडचे जे.ई.गायकवाड साहेब आहेत त्यांची बदली करणेत यावी. त्यांना कुठलेही काम सांगितले तर ते हॉ करतात असे म्हणतात पण काम करत नाहीत. ड्रेनेजलाईन ही स्ट्रॉम वॉटर मध्ये टाकलेली आहे दोन्ही पाणी एकत्रच जात आहे. तरी आपण याची दखल घ्यावी अशी मी विनंती करतो. जे जे अधिकारी वर्ग आहेत त्यांच्यावर कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

**मा.उषा मुंढे -** मा. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आयुक्त साहेब, हा पर्यावरणाचा विषय ८ महिन्यापुर्वी आलेला होता. त्यावेळेस पण माझ्याकडं बघितलं जातं पर्यावरणाचा विषय हा माझ्या कमिटीमध्ये येत नसून जैवविविधता कमीटी ही माझी आहे जैवविविधता कमीटी ही काय आहे हेच जर कुलकर्णी साहेबांना माहिती नसेल तर आणि पर्यावरण म्हणुन जर तुम्ही माझ्याकडे बघत असाल तर मी काय करायचं आयुक्त साहेब,तुम्हीच मला समजुन सांगा की, माझे अधिकार काय आहेत?

**मा.भाऊसाहेब भोईर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक. कोणत्या कमिटीला काय,काय अधिकार आहेत याची कार्यपत्रीका आपण प्रस्तावित करावी. ब-याच जणांचा संभ्रम आहे तो दूर होईल. पर्यावरणाच्या संदर्भात सर्व सन्मा.सदस्यांनी महत्वाच्या सूचना दिलेल्या आहेत. खरंतर जागतिक संकट सर्वात मोठं कोणतं भेडसावत होतं कोरोनाच्या आगोदर तर ग्लोबल वॉर्मींगच जगाला तिस-या महायुध्दापेक्षा मोठं संकट होतं ते या पर्यावरणाचं आणि म्हणुन मधल्या कालखंडामध्ये आपण त्याकडे थोडं दुर्लक्ष केलं कारण एका मोठया रोगाला सामोरे जात असताना नाही म्हटलं तरी या गोष्टीकडे दुर्लक्ष होत गेलं. मी पहिल्यापासून या सभागृहामध्ये माझे मत व्यक्त करत आलेलो आहे की,तुम्ही हा विषय गांर्भीयाने का घेत नाही. कारण या कोरोनाच्या आगोदर नवी मुंबई पासून पुण्यापर्यंत संपुर्ण हवा दुषीत झालेली आहे. शहरं रहाण्याजोगी झालेली नव्हती असं जागतिक अहवालातनं सिध्द झालेलं आहे. दिल्ली पेक्षाही भयानक अवस्था आपल्या शहरामध्ये येऊन ठेपलेली होती. या कोरोनामुळे या सगळया गोष्टीचा समतोल राखला गेला. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आजपर्यंतच्या इतिहासामध्ये पर्यावरणाकडं कधीही गांर्भीयाने लक्ष दिलेलं नाही. कारण इतर निविदा या मोठया असतात. आणि त्या आर्थीक आणि भौतिक प्रगतीमध्ये आपण जास्त गांर्भीयाने लक्ष देत गेलो. पण या गोष्टीकडे आपण कायम  दुर्लक्ष करीत आलेलो आहोत. आपण मैलाशुध्दीकरण केंद्र करतो,अंडरग्राऊंड ड्रेनेजच पाण कुठ गेल पाहीजे, मैलाशुध्दीकरणामध्ये व मैलाशुध्दीकरणामध्ये ते शुध्दीकरण करुन ते नंतर नाल्यात सोडून पुन्हा नदीला जावून मिळतं, आजपर्यंत झालेलं आहे का? आता आपण सर्वजण जाऊ सर्व अंडरग्राऊड ड्रेनेजचं पाणी डायरेक्ट  नाल्यामध्ये सोडलेलं आहे. आणि हे आपण किती वर्ष ओरडायचं, या सर्व गोष्टीवर किती वर्ष बोलायचं  भोपाळला वायुगळती झाल्यानंतर लोक गेल्यानंतर मग चर्चा होऊन गेल्यानंतर मग त्यावर पर्याय

शोधलेले आहेत. मग नदीचे पाणी पिऊन जनावरं मरणार, कोयना धरणामध्ये जसे हजारो मासे मेले नंतर मग जागे होतो. जसं एखादया आरक्षण बदली करण्यासाठी,एखादया विषयाला ताबडतोब उपसूचना देण्यासाठी या सर्व गोष्टीसाठी प्रशासनाने घाई-गडबडीने नियोजनबध्द दिर्घकाळ कामं करतं तसं पर्यावरणाच्या संदर्भामध्ये तसं का करत नाही. मी वृक्षसंवर्धन समितीमध्ये आहे झाडं मोजण्यासाठीचं टेंडर ६ कोटी रु.चे आहे. मी त्याला सहज बोलवल तर त्याला वाटल आपण प्रत्येक्ष जावून भेटाव तर मी म्हणलो वैयक्तिक नको भेटू, तीकडे मिटींगमध्ये भेट. याचं आयुक्तांना सुध्दा आश्चर्य वाटलं की, कुठली झाडं मोजली आहेत झाडं मोजण्याचं टेंडर ६ कोटीचं असेल आणि दिड वर्षामध्ये काहीच केलं नसेल तर आपण कुठं चाललो आहे. नाही म्हणलं तरी आपण स्वत:च आत्मचिंतन तरी करा की,आपण हे काय करतोय. या वृक्षसंवर्धन समितीचा अर्थच तो आहे की हे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी काही काही नियाजनबध्द काम केल पाहीजे. पर्यावरणासाठी आपण काय,काय नियोजनबध्द कामं केली पाहिजेत. आयुक्त साहेब,तुमच्यापर्यंत फाईल गेली आणि परत आली. मा.महापौर साहेब, गेली १२ वर्ष मी अंदाजपत्रकात एक तरतुद पाहिली आहे की १ कोटी रु.ही जाहीरातीसाठी खर्च करावे लागतात. जाहीरातीचं युग आहे. अत्यावश्यक काय पाहिजे, मी ४/५ चित्रपटाचं निर्मीती केली जस स्वस्त धान्याची दुकान अतात तसं स्वस्तामध्ये व्यवस्थीत नियोजन करुन देतो आहे. फाईलवर चर्चा करा त्यावर संतोष पाटील यांनी चर्चा करुन, करुन वाट लावली आणि निघुन गेले. आयुक्त साहेब, आयुक्त साहेब तुमच्याकडे फाईल आली होती तेव्हा मी विनंती केली होती का. इथल्या शहरामध्ये मुक्ता बर्वे सारखे ॲक्टर्स आहेत, प्रशांत दामले आहेत, नीता दामले आहेत, सोनाली कुलकर्णी आहे. यांना जर सांगितलं की या शहरासाठी जाहीरात करा तर सगळं जग बघेल तुमची जाहीरात. हे सगळे आपल्या शहराचे भूमिपुत्र आहेत. आपल्या अधिका-यांना याचं काही गांभीर्य नाही यांना फक्त मोठे टेंडर, रिटेंडर, उपसूचना, आयुक्तांच्या खालच्या अधिका-यांची जी टीम आहे यांच रॅकेट, आणि मग कोणत्या अधिका-याला पकडल्यानंतर कोणत काम होतयं यात सगळे मश्गुल आहेत. आणि कोरोनामुळे या सगळया गोष्टी झाकलेल्या आहेत. याचा जेंव्हा उद्रेक होईल तेंव्हा त्यास आपण जबाबदार रहाल. त्यामुळे या पर्यावरणाच्या संदर्भात आपण एक विशेष सभा घ्या. हा विषय सर्वांना कळू द्या नेमकं आपण काय करतोय,कशासाठी करतोय. २०/२० वर्ष अंडरग्राऊंड ड्रेनेजचं पाणी नाल्यामध्ये जात आहे. आठ दहा वर्षापुर्वी मास्टरप्लॅन काढलेला आहे आम्ही. हा विषय सोपा नाही.

या कोरोनामुळे या सगळया गोष्टी झाकलेल्या आहेत आणि त्याचा उद्रेक कैंव्हा तरी येईल आणि त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागतील. ब-याच वेळा कळत न कळत आपल्या सर्वांना भोगावं लागत. म्हणुन मा.महापौर साहेब, या विषयासाठी एक विशेष सभा घ्या. याठिकाणी पक्षीय वादविवाद करण्याचा विषय नाही. त्यामुळे वृक्षसंवर्धन समितीमध्ये वृक्ष लागवड ही परत परत त्याच खड्डयामध्ये होते की काय असं वाटतयं. मी कधी कधी विचार करतोय की, गेल्या २०/२५ वर्षापासून दरवर्षी ७० हजार झाडं लावली, एक लाख झाड लावली. अहो,इतकी झाडं लावली असती तर माणसाला एकमेकाला झाडं कापूनच बघावं लागलं असतं. काय,कुठे झाडं लावली हेच कळनां मला आजपर्यंत आणि वृक्ष प्राधिकरण समितीला झाडं काढण्याचा विषय येतो. मग तुम्ही झाडं कोणती मोजता. हे सगळं काय चाललं आहे ते समजत नाही पण हा विषय गांर्भीयाने घ्या. आणि अत्यंत महत्वाचं नियोजन करा. आयुक्त साहेब,तुम्ही याठिकाणी किती दिवस आहात हे मला माहिती नाही. या शहरातील पर्यावरण हे सगळं दुषित झालेलं आहे. पवना नदीचं सगळं गटर झालेलं आहे. हा विषय गांर्भीयाने घेऊन या विषयासाठी विशेष सभा घेण्यात यावी अशी मी मागणी करतो.

**मा.अॅड.सचिन भोसले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. शहरातील अत्यंत महत्वाच्या अशा या पर्यावरणावर आपण सर्वजण चर्चा करीत आहोत. माई आपणांस सर्वप्रथम मी आपल्याला विनंती करतो की, हा विषय आपण तहकुब ठेवणेत यावा कारण हा अहवाल मला रात्री मिळालेला आहे. हा अहवाल कोणीच वाचलेला नाही. पर्यावरणाच्या संदर्भात अनेक प्रश्न आहेत त्यामुळे या विषयावर खरंच विचार करण्याची गरज आहे. मा.आयुक्त साहेब, शहरातील पर्यावरणाच्या बाबतीत बोलायचं झालं तर प्रथम नदीचे प्रदुषण होत आहे. ब-याचशा कंपन्या या त्यांच पाणी हे डायरेक्ट नाल्यामध्ये सोडतात त्यामुळे प्रदुषण होत आहे. आणि त्यामुळे नदीतील मासे,इतर काही प्राणी असतील ते मरतात आणि त्यातुन जे काही रोग निर्माण होतात त्याच्यासाठी सन्मा.आयुक्त साहेब,आपल्याकडनं एवढाच खुलासा पाहिजे की, आपण गेल्या ४/५ वर्षाच्या कालावधीमध्ये आपण कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत. याच्यावर आपण नियंत्रण आणण्यासाठी कोणत्या योजना राबवल्या आहेत. दुसरा मुद्या गेल्या ४/५ वर्षामध्ये जलपर्णीचा विषय नेहमीच गाजत असतो. जलपर्णी काढण्यासाठीचं दरवर्षीचे टेंडर ४,५,६,९ कोटीचा विषय असतो. म्हणजे मागील ४/५ वर्षाचा विचार केला तर ३० ते ३५ कोटी

रु.जलपर्णी काढण्यासाठी खर्च झालेले आहेत. परंतु आज जर आपण प्रत्यक्ष पाहिलं तर शहरातील एकही नदी अशी नाही की, जिथं तुम्हांला जलपर्णी दिसणार नाही. पावसाळयाच्या पुढं तुम्ही जलपर्णी काढली परंतु त्याच्यावर परमनंन्ट उपाय आजपर्यंत तुम्ही करु शकलेले नाहीत. हे आपण आजपर्यंत करु शकलो नाही. किंवा पुढचा आपला काय प्लॅन आहे हे आपण करु शकत नाही. आणि प्रयत्न सुध्दा करु शकलो नाही आणि केला असेल तर तो अयशस्वी म्हणाव लागेल. उदाहरण सांगतो की आमच्या प्रभागामध्ये पवना नदी आहे पवना नदीची आजची परिस्थिती पाहिली तर ती पुर्ण नदी आहे असं वाटतच नाही. एक गार्डन आहे असं वाटतयं पूर्ण जलपर्णीनं भरलेलं आहे. मा.आयुक्त साहेब,मी आपल्याला नम्र विनंती करतो की, येणा-या १०/१५ दिवसाच्या आत या विषयामध्ये आपण जातीने लक्षं घालून या शहरातल्या सर्व  नदयामधील जलपर्णी ही त्वरीत काढून घेण्याची आपण तजवीज करावी अन्यथा शिवसेना या सर्व नदीच्या किना-यावरती बसुन एक मोठं आंदोलन उभ करेल आणि त्या आंदोलनामध्ये जे काही परिणाम होतील त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल.पर्यावरणाच्या बाबतीत अनेक गोष्टी आहेत त्यामधील मी फक्त एकच मुद्या सांगितला आहे. त्याच  विषयावर आपण विचार करावा. अशी मी या सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**मा.प्रज्ञा खानोलकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.आयुक्त साहेब,  गेल्या ४ वर्षापुर्वी मी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड संदर्भात आपल्याला पत्र दिलं होतं की, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे जे दुषीत पाणी आहे ते आपल्या नदीत मिसळून आख्ख पिंपरी चिंचवड शहर पाणी पित आहे. यासंदर्भात देहुरोड कॅंन्टोन्मेंट बोर्डाने एसटीपी प्लॅन्ट उभा करुन पाणी शुध्द करुन नदीत सोडावे यासंदर्भात मी पत्र दिलेलं होतं. त्यावर आजपर्यंत कुठलीही कारवाई केली गेलेली नाही. आयुक्त साहेब,आपण देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाला सक्तीचे आदेश देवुन त्यांनी एसटीपी प्लॅन्ट उभा करुन त्यामधुनच दुषीत पाणी शुध्द करुन नदीत सोडावे असे आपल्यामार्फत त्यांना कळविण्यात यावे. अशी विनंती करते.

**मा.सुवर्णा बुर्डे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मागच्या वर्षी असाच पर्यावरणाचा विषय झाला होता. त्यावेळेसही मी असा विषय घेतला होता की, माझ्या प्रभागामध्ये निर्गूडी बंधारा ते मोशी टोल नाका इथपर्यंत ही नदी माझ्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये येते. याच्यामध्ये हिरामाता टेंम्पल आहे तीथे आपला एक

एसटीपी प्लान्ट आहे आणि आता दुसरा पण चालू झाला आहे आणि आता तीसरा पण चालू करतात तरी या दोन प्लान्टच मी मागच्यावेळेस सांगीतल होतं की आपली जी नदीच्या कडेनी लाईन गेलेली आहे ती पुर्ण लिकेज आहे त्या नदीमध्ये सगळ पाणी साठतय, सगळ तीथे जातय आणि मी मागे सांगीतल्याप्रमाणे आमच्या शेतामध्ये सगळीकडे ते पाणी दिलं जात. ते शेतांमध्ये भाजीपाल्याला पाणी जातं. त्यांचे सगळयांचे हातपाय त्या पाण्यानी खराब होतात हे मी मागे पण सांगीतल होतं आणि भाजीपाला पण खराब होतो. हे मी मागच्या वर्षी सांगीतल होतं तरी हे चालूच आहे आणि आता तीसरा प्लान्ट होतो. तरी या तीस-या प्लान्टला माझा विरोध आहे. हा प्लान्ट होवू नये आदिच्याच प्लॉन्टमध्ये पाईपलाईन तुम्ही व्यवस्थीत करुन ठेवा. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्याकडे जेवढे ड्रेनेजलाईन झालेल्या आहेत त्या ड्रेनेजलाईन ओपन आहेत ते पुर्ण पॅक केलेले नाही. त्याच सांडपाणी सुध्दा नदीमध्ये जात आणि आमच्याकडे अजूनही ड्रेनेजलाईन नाही. जोपर्यंत ही ड्रेनेजलाईन होत नाही तोपर्यंत हा तीसरा प्लॉन्ट मी करु देणार नाही माझा याला विरोध आहे तरी ही आपण दक्षता घ्यावी आणि मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पर्यांवरणाच्या विषया संदर्भात सर्वांनीच याठिकाणी मत मांडली आहेत. याठिकाणी माझी मागणी आहे की पर्यावरण डिपार्टमेंटच स्ट्रक्चर नेमक कसं आहे. आपल्याकडे कुलकर्णी साहेब आहेत हे सगळयांनाच माहीती आहेत परंतु त्यांच्या अंडर कोण कोण काम करत, किती अधिकारी काम करतात आणि नेमक कशा स्वरुपाच कामकाज त्या डिपार्टमेंटकडन केल जातं आणि त्या अनुषंगाने तुषार कामठेनी विषय आपल्या समोर मांडला होता आणि त्याचा खुलासा करणं अपेक्षीत होतं की तीन जेईला आपण नागालँडला शिकायला पाठवल, त्याठिकाणी त्यांच्यावरती आपण जवळ पास वीस वीस लाखाचा खर्च केला आणि प्रत्येक्षात जेव्हा ते येथे जॉईन्ट झाले त्यावेळेस त्यांना आपण पर्यावरण डिपार्टमेंट न देता त्यांना नगररचना असेल किंवा बिल्डींग परमीशन डिपार्टमेंटमध्ये जॉईन्ट केलं. याच्या मागचा नेमका हेतू काय आहे हे पण कळाल पाहीजे. तसेच सभागृहाला कळाल पाहीजे की पर्यावरण डिपार्टमेंट नेमकं काय काम करतं. आता मगाशी बोलता बोलता मुंढेताई म्हणाल्या नेमक कशा स्वरुपाच कामकाज आहे हे मलाही माहीती नाही आणि त्यांना त्या अधिका-यांनीही कधी खुलासा जावून दिला नाही. तरी या अनुषंगाने सभागृहाला कळल पाहीजे की

नेमक पर्यावरण डिपार्टमेंट काय काम करतं. आज जगामध्ये सगळयात मोठी समस्या कुठली आहेतर पर्यावरणाची आहे. मगाशी भाऊसाहेबांनी ग्लोबल वॉर्निंग संदर्भात खुलासा केला. संपुर्ण जग याच्या संदर्भात बारकाईने लक्ष देवून काम करण्याचा प्रयत्न करतं. कोरोनाच्या काळामध्ये जगामध्ये आज आपण जर पाहीलतर अनेक त्रासाला आपण समोर गेलो परंतु त्याच्यामध्ये एक चांगली गोष्ट काय घडली ती प्रदुषण कमी झालं. कारण गाडयांची वाहतूक कमी झाली, त्याच्यामुळे निश्तिपणे अनेक प्रकारच प्रदुषण कमी झालं त्यामुळे तो एक फायदा या काळामध्ये झाला. या सगळयावर आपल्या महापालिकेच पर्यावरण डिपार्टमेंट कसं काम करतं हे सुध्दा कळल पाहीजे. महाराष्ट्र गव्हर्मेंटने गेल्या अनेक वर्षापासून एन्व्हायरन्मेंट डिपार्टमेंट केल. दोन लाख लोकसंख्येच्या पुढ जर एखाद कन्स्ट्रक्शन असेलतर त्यासाठी एक एन्व्हायरमेंट कमिटी स्थापन केलेली आहे. आणि ती कमिटी प्रत्येक दोन लाखाच्या पुढचे त्याच्यामध्ये बारकाईने बघीतल जातं की कशा पध्दतीने पर्यावरण जोपासण्याच काम त्या कमिटीच्या माध्यमातून केलं जात. आणि प्रत्येक गोष्ट अतीशय कडकपणे त्याची अंमलबजावणी ते डिपार्टमेंट करुन घेतं असत त्या अनुषंगाने आपल्या महापालिकेच्या स्थरावरती कुठतरी आपण कमी पडतो हे निश्चितपणे आहे. दुसर मला याठिकाणी एक निदर्शनास आणुन दयायच आहे की आमच्या भोसरीची स्मशानभूमी आहे आणि त्या स्मशानभूमीमध्ये पर्यावरण डिपार्टमेंटनी एक एक्झॉष्टच युनीट बसवलेल आहे. मला वाटते संतोष आण्णानी सुध्दा स्टॅण्डींग कमिटीच्या मिटींगमध्ये अनेकवेळा हा विषय घेतला होता. त्याठिकाणी मृत्यु झाल्यानंतर ज्यावेळेस अन्त्यविधीसाठी जातो त्यावेळेस तीथे जो धुर येतो तो धुर त्या एक्झॉस्टमधन बाहेर टाकत नाही तो सगळया लोकांच्या अंगावर जातो त्याच्यामागच कारण आहे की ते जे युनीट बसवल आहे ते बसवल्यापासून ते कधी आजतागायत चालू नाही. वारंवार आम्ही भोसरीच्या सगळया नगरसेवकांनी या गोष्टीची तक्रार करुन सुध्दा त्याच्यावरती कुठलीही कारवाई झाली नाही इतक्या हलगर्जीपणाने काम ते डिपार्टमेंट करतं. असे अनेक मुद्दे आहेत. मगा तो विषय महापौर तुम्ही तहकूब केला तो सुध्दा पर्यारणाशीच निगडीत आहे त्याच्यावरती अनेक लोकांना बोलायच होतं परंतु अशा मोठमोठया विषयात या लोकांना इन्ट्रेस्ट आहे. असे मोठे विषय कोठयावधी रुपयाचे आणायचे आणि त्याच्यातून काहीतरी फायदा करुन घ्यायचा अशा भावनेतून काम करणारी काही मंडळी त्या डिपार्टमेंटमध्ये आहे मला काही कुणाचे नाव घ्यायचे नाही परंतु ही फॅक्ट आहे. त्याच्यामुळे आयुक्त साहेब या डिपार्टमेंटला बारकाईनी लक्ष देण्याची

गरज आहे. ही शहराची आणि नागरीकांची गरज लक्षात घेवून त्या संदर्भात गांभीर्यान लक्ष दयाव. पर्यावरण विभागाचे एचओडी जे आहेत त्यांनी याठिकाणी पर्यावरणा संदर्भात चार शब्द सांगू दयात कारण आम्ही सगळे बोलतोय. तरी त्यांनी याठिकाणी खुलासा करावा अशाप्रकारची अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो.

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज जो हा पर्यावरणाचा विषय चालला आहे त्यासंदर्भात चार वर्षात मी वेळोवेळी सांगीतलेल आहे. फक्त दोनदाच मिटींग झालेल्या आहेत. उषाताईकड पर्यावरणाचे अध्यक्ष म्हणून बघीतल जातं. पण खरच या समितीचा काहीही उपयोग नाही. ही समिती शासनाने दिलेली आहे जर याच्यातून कुठल काम करायला संधी मिळत नसेलतर आणि त्यातली काही माहीतीच मिळत नसेलतर ही कमिटी बरखास्त करावी अशी माझी विनंती आहे.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पर्यावरणाच्या विषयावर आता आपले बरेच मार्गदर्शक बोलले. मी ह क्षेत्राचा अध्यक्ष असतानी आमच्या मार्गदर्शक नगरसेवीका शेंडगेताई, काटेताई आम्ही सर्वजण आमच्या प्रभागामध्ये दापोडी असू दयात, कासारवाडी असू दयात, नवी सांगवी आणि जूनी सांगवी या भागातून दोन नदया गेलेल्या आहेत आणि आयुक्त साहेब त्यावेळेला नवीन आलेले होते त्यावेळेस ते आमच्या जून्या सांगवीचा दौरा करत होते. त्यांना जलपर्णी दाखवत असतानी आयुक्त साहेबांना मच्छर जशा माशा चावत होत्याना तसे आयुक्त साहेबांना मच्छर चावत होते. आयुक्त साहेब पुढ पळत होते आम्ही त्यांच्या माग होतो. आयुक्त साहेबांना विचारा हे खोट नाही. नवीनच आयुक्त साहेब आलेले होते. तरी माझ एवढच म्हणणं आहे की आपले जे कोणी अधिकारी असतील हया नदीत जे घाण पाणी जातय किंवा कंपन्यांच पाणी जात असेल किंवा राडारोडा टाकल्या जातो त्याच्यामुळ ही जलपर्णी तयार होते. आपल्या अधिका-यांनी अभ्यास करायला पाहीजे की या शहरामधुन एवढया सुंदर दोन नदया येतात आणि त्यात जे पाणी जात त्या पाण्यात अनेक गोष्टी सोडल्या जातात त्याच्यामुळ ही जलपर्णी तयार होते. आता आमचे ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर साहेब, काल एक विषय स्टॅण्डींगला आला कारण मी साडेतीन वर्षे प्रभागाचा अध्यक्ष होतो मी सारखा कुलकर्णी साहेबांना बोलवायचो आणि सांगायचो की नदयामध्ये राडा टाकला जातोय तर काल एक स्टॅण्डींगला ११ कोटीचा असा एक विषय आला की नदयामधला राडा

काढायचा आहे मग कुलकर्णी साहेब काय आतापर्यंत झोपले होते काय. मलातर वाटतय मी तीन वर्षे त्यांना सांगत होतो. आमच्या प्रभागातील सोळा नगरसेक आहेत प्रभागाची मिटींगच्या वेळेस कुलकर्णी साहेबांना या गोष्टी सांगायचो. काल विषय आला मी लगेच कुलकर्णी साहेबांना बोललो कुलकर्णी साहेब आता हा विषय तुम्हीच आणला आहे मग तुम्ही झोपले होते का आतापर्यंत राडा पडत होता तो. अशा गोष्टी आपले अधिकारी अजीबात मनावर घेत नाहीत. आयुक्त साहेब याच्यावर गंभीरपणे लक्ष दयायला पाहीजे. सुंदर अशा दोन नदया आपल्या या शहरामधुन येतात आणि त्याच्यातूनच या अनेक गोष्टी आपल्याला भोगाव्या लागतात. मला जे दोन शब्द बोलायला दिले त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद मानतो.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पर्यावरणाचा दरवर्षी अहवाल येतो. आता सगळयांनी सांगीतल अहवाल कधी आला काय आला अजूनपर्यंत माझ्यापर्यंत तरी काही पोहचलेला नाही. सर्वात महत्वाच म्हणजे मागच्या पेपरला बातमी वाचली ही महापालिका १९७० ला स्थापन झाली. नगरपालीका त्याच्यानंतर महानगरपालिका असं झालेल आहे. पन्नास वर्षापर्यंत पवना नदीची लांबी आपण २४ कि.मी. पर्यंत धरत होतो. १८ कि.मी.इंद्रायणी नदी आणि मुळा नदी ती ६ कि.मी. म्हणजे वाकडपासून पिंपळे निलखच्या हद्दीमध्ये म्हणजे सांगवी पर्यंत. एकच कन्सलटंट राहीला मी आयुक्त साहेबांना विनंती केली की एकच आलेला आहे त्याच्याकडन सर्व्हे करुन घेवू. दोन्ही नदयाचा त्याला सर्व्हे करायला लावला. आठ ते साडे आठ कि.मी. पवनानदीची लांबी वाढली,इंद्रायणीची वाढली अस काहीकाही झालेलं आहे. आपण त्याला सव्वाकोट वाढवून दिले. म्हणजे ५० वर्षानी कळल का की नदीची लांबी एवढी एवढी आहे आणि आता आपण डीपीआर बनवलेला आहे मी पण कुलकर्णी साहेबांकडे जावून प्रेझेन्टेशन बघीतलेल आहे. २७५७ कोटीचा काहीतरी सगळा तो प्रोजेक्ट आहे. आयुक्त साहेब मला सांगायला खेद वाटतो की मी जरी सत्ताधारी पक्षात नगरसेवक आहे मी नदीसुधारसाठी गेल्या तीन ते चार वर्षापासून काम करतो फॉर्मच्या परमीशनपासून. आता बुर्डे ताईनी पण सांगीतल की नदीपात्रात ड्रेनेजलाईनच पाणी म्हणजे एसटीपीला न जाता डायरेक्ट नदीत जातं, भाऊसाहेब पण तेच बोलले, ब-याच लोकांना हे माहीती आहे. आणि वेळोवेळी हे उघडकीस पण आणलं आणि व्हिडीओ रेकॉर्डींग पण संबंधित अधिका-यांना दिलं जातं पण आजपर्यंत कारवाई कुठ झालेली नाही. या सर्व गोष्टीसाठी मी पहील राज्यसरकारकड अपिल केल होतं त्याची ९०

दिवसाची मुदत होवून गेली त्याच्यानंतर आता मी नाईलाजास्तव हायकोर्टात पिटीशन दाखल केलं. की तीथ जी अंनागोंदी सर्व चाललेली आहे आणि मी मागे पण बोललो आहे की नदी ही आपली आई आहे. ती चांगली सुधारली पाहीजे चांगली राहीली पाहीजे आपण तीथे गेलोतर आपल्याला स्वच्छता वाटल पाहीजे. मग ती इंद्रायणी असेल, पवना असेल, मुठा असेल सगळया नदया तीच इन्व्हायरमेंट चांगल राहील पाहीजे. याच्यासाठी इन्व्हायरमेंट डिपार्टमेंटनी काहीही काम केलेल नाही. आजपर्यंत फक्त टेंडर काढायच आणि आपल्या स्वतःच्या पार्टनर लोकांचे हात ओले करायचे. आयुक्त साहेब तुम्ही याच्यात जातीपुर्वक लक्ष घातल पाहीजे. तुम्ही कुठल्या अधिका-यांना पाठीशी घालून हा उदयोग करु नका. कारण की आता भाऊसाहेब पण म्हणाले तुम्ही आता जाल वगैरे पण जाल जाल म्हणून तुम्ही चार वर्षे राहीलात आणि आमचेही चार वर्षे गेलेत. आता राहीलेल्या एक वर्षामध्ये तरी नदया सुधारच टेंडर वगैरे पब्लिश करुन मी तुम्हांला म्हणल होत दोन हजार कोटीचे बॉण्ड काढा ते सुध्दा नाही काढले, तुम्ही म्हणाले हाळूहाळू काढू. साहेब, जे काही करायच आहेना ते एकदाच स्टार्ट टू एण्ड काम करा आणि त्या कामाचा फडशा पाडून टाका आणि जेणेकरुन असं वाटल पाहीजे की आयुक्त साहेबांनी शहरासाठी काहीतरी केल आणि तुषार कामठेचा खुलासा आहे तो करावा एवढ बोलून थांबतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका**.** मी आपल्या निदर्शनास आणून देतो की माझ्या प्रभागामध्ये काळभोरनगरच्या परिसरामध्ये इन्डस्ट्रीअल सेक्टर मोठया प्रमाणावर आहे. त्याठिकाणची वारंवार आम्ही संजय कुलकर्णी यांच्याकडे तक्रार पण केलेली आहे की तीथल्या धुरानी तीथल्या लोकांच्या घशामध्ये, लिव्हरचे त्रासेस व्हायला लागलेले आहेत. ती मी आपल्याला विनंती करतो की एवढी माहीती दयावी इन्डस्ट्रीअल सेक्टरच जे वेस्ट आहे किंवा त्याच्यातून जो निर्माण होणारा धुर आहे त्याच्यावर नियोजन करण्याकरीता महापालीकेच्या वतीने कुठली नियमावली आहे की नाही आणि त्या नियमावलीची अंमलबजावणी होतेय का नाही. आपल्या शहरामध्ये एवढया इन्डसट्रीज आहेत त्यातून होणार प्रदूषण याच्यावर नियंत्रण आणण्यासाठी कुठली योजना आपल्याकडे आहे का. किंवा या इन्डस्ट्रीजमध्ये जावून कुणी चेक करतय का नाही. जी हवा प्रदूषीत होते त्याच्यावर कुठले बंधन आणता येतील का नाही त्याबाबत आपण खुलासा दयावा.

**मा.स्वाती (माई) काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माझ्या प्रभागात दोन नदयाचा संगम होतो पण तीथल पाणी घाण कशामुळे होतय की नदीमध्ये सगळा राडारोडा सोडला जातो ते कशामुळ तर अतीक्रमणमुळे होतय. ड्रेनेज लाईन आणि स्ट्रॉम वॉटरची लाईन एकत्रीत जोडणीमुळे ते पाणी कुठ जात ते कळत नाही. इतकी परिस्थिती बिकट आहे की तुम्ही जाता येता तीथ थांबून बघा. इतका घाण त्या नदीचा वास येतो की स्मशानभूमीमध्ये गेल्यानंतर दोन मिनीट सुध्दा बसवत नाही इतकी परिस्थिती बीकट झालेली आहे. जलपर्णी पुर्ण नष्ट करा असं मी पहील्यापासून सांगत आलेली आहे. ते काय करतात तात्पुरत काढतात आणि कडेनी तसेच राहीलेली असते ती तशीच राहते त्याच्यामुळ परत ती पसरते. तरी एकदाच त्याचा काहीतरी शोध करा आणि ती नष्ट करुन टाका. नदीच्या पाण्याचा वास कशामुळे येतो तर माई त्या पुलावरती तुम्ही दोन मिनीटे थांबा, आयुक्तांना सुध्दा येता जाता माहीत असेल कि  इतका घाण वास येतो की आपण जर थांबलोतर थांबावस सुध्दा वाटत नाही. तरी जो राडारोडा टाकला जातो तो बंद झाला पाहीजे आणि त्या नदीमध्ये जी काही घाण सोडतात ती पण बंद केली पाहीजे. कासारवाडीपासून ते दापोडीपर्यंत त्या पाण्याची काय अवस्था झालेली आहे ते बघावे. त्यात दोन्ही नदयांचा संगम, तीकडच पाणी स्वच्छ असत आणि इकडच पाणी घाण असतं. ते ताबडतोब दिसून येत की कोणत्या पाण्याची किती फरक आपल्याला दिसतो ते. तरी माई त्या नदीच्या पाण्याचा काहीतरी बंदोबस्त करावा आणि लोकांना त्रास झाला नाही पाहिजे यासाठी तुम्ही जातीने लक्ष दिले पाहीजे. तुम्ही पण एकदा व्हिजीट करा म्हणजे तुमच्या लक्षात येईल, धन्यवाद.

**मा.आशा धायगूडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मला वाटते पर्यावरणाचा विषय आज तहकूब होईल परंतु आज तुम्ही सगळयांना बोलू देता त्यामुळे तुमच मनापासून याठिकाणी कौतूक केल पाहीजे आणि तुमचे आभारही मानले पाहीजे. मगाशी मंगलाताईनी सांगीतल की अनेकांनी आपआपल्या समस्या मांडल्या पर्यावरण हा देशाचा, शहराचा आणि जगाचा महत्वपुर्ण प्रश्न असताना देखील आपल्याकडे पर्यावरणाचा अहवाल काल नऊ, दहा पर्यंत नगरसेवकांच्या घरापर्यंत पोहचला. काहीकडे पोहचलाही नसेल. आता सिमाताई म्हणाल्या मला

पोहचला नाही, संदिप वाघेरे म्हणाले मलाही पोहचला नाही. अस असताना अडकवून राहील्यानी हा विषय नक्कीच मंजूर करणार नाहीत याची खात्री वाटते. आयुक्त साहेब मी दोन तीन महीन्यापुर्वी तुमच्याकडे एक पत्र दिलेलं होतं की पिंपरी चिंचवड शहरातून जी काही माझ्या शहरातून पवना नदी आली, पुर्ण शहरातून वाहणा-या पवना नदीच पत्र दिलं होतं. कासारवाडी असेल, फुगेवाडी असेल, दापोडी असेल, पिंपरी, रावेत अशा सगळया परिसरामधून जाणा-या पवना नदीमध्ये किती मोठया प्रमाणामध्ये राडारोडा टाकला जातो असा प्रश्न विचारलेनंतर मला उत्तर काय आल की त्यांनी सांगीतल की कासारवाडी मध्ये अमक्यावर, तुमक्यावर कारवाई केली. याच्यामुळ काय होइल की तुमच्या आशाताईनी पत्र दिलं त्यामुळे आम्ही कारवाई केली. मी या शहराची नगरसेवक आहे फक्त प्रभागापुरती मर्यादीत नक्की नाही या शहराची आहे. उदया मी पुढची टर्म लढवेल, नाही लढवेल, निवडून येईल नाही येणार हा पुढचा जर तरचा विषय आहे. परंतु मी असताना मी या शहरासाठी काय चांगल दिलं, काय चांगल केलं आणि अशा वेळेला मला उत्तर आल की आपल्या वॉर्डातील तीन लोकांवर कारवाई केली. मी कुणावर कारवाईच पत्र दिलेलं नव्हतं तुम्हांला. मी शहरामध्ये किती राडारोडा टाकला जातो त्याच्यावर महानगरपालिका काय काम करते असा साधा प्रश्न विचारला होता आणि त्याच्यावरती आपण खुलासा देणं अपेक्षीत होतं. मला सांगीतल गेल की ह प्रभागामध्ये आपण निवीदा काढली राडारोडा उचलण्याची. मला विचारायच आहे की आपण निवीदा काढली ती कधी ओपन केली त्यांनंतर आपण वर्क ऑर्डर दिली का. साहेब, इतका महत्वपुर्ण प्रश्न आहे शहराचा राडारोडा नदीमध्ये टाकल्याने दिवसेंदिवस नदीच पात्र लहान होत चालल आहे. पवना नदी असेल, इंद्रायणी असेल, मुळा-मुठा नदी असेल या सगळया नदयांवरती मोठया प्रमाणामध्ये अतिक्रमण झालेल असताना इतका मोठा आपला पर्यावरण विभाग आहे त्या पर्यावरण विभागामधन काहीही करत नाहीत. आम्ही सत्ताधारी असो काही काहीही असा त्याच्यापासून पळून चालणार नाहीत. एखाद दुसर काम कमी झालंतरी ते चालून जातं. परंतु पर्यावरनावरती गांभीर्यान विचार करण्याची वेळ आलेली आहे. संजय कुलकर्णी साहेबांना मी अनेकवेळा सांगीतलेल होतं की साहेब राडारोडा टाकतात, मी सांगीतल की तुम्ही मेट्रोवाल्यांना विचारा की तुम्ही राडारोडा काढला त्यांनी तो आपल्या वेष्ट एनर्जीमध्ये म्हणा किंवा सीएनजी वेस्टमध्ये दिलातर त्याचे चलन भेटतात त्यांनी ते दाखवायचे. त्यांनी सगळयाची सगळा राडारोडा हा नदीच्या किनारी असेल त्या ठिकाणी फुकटमध्ये भराव टाकला आणि ते हे काम करत

असताना माझ्या शहराच वाटोळ करण्याच काम प्रामुख्याने या मेट्रो विभागाने केलं. तुम्ही तेथे येवून बघा आपल्या ठेकेदारांचे जेसीबी चालतात मेट्रोने टाकलेल मटेरीअल प्लेन करण्यासाठी तोही व्हिडीओ मी तुम्हांला देवू शकते. आणि हे काही फक्त फुगेवाडीत चालत, कासारवाडीत चालतं, दापोडीत चालतं अशातला काही विषय नाही तर सर्व शहरामधला हा विषय आहे. साहेब, एखादा गांभीर्यपुर्वक विषय असेलतर आम्ही तुमच्या पर्यंत पोहचवितो नाहीतर आम्ही आमच्या त्या सगळया विषयाची विल्हेवाट आम्ही आमच्या लेव्हलवर अधिका-याशी चर्चा करुन तीथल्या तीथेच करत असतो. परंतु ज्यावेळेला असं वाटत की हा अत्यंत काळजीपुर्वक हाताळण्याचा विषय आहे आम्ही आयुक्त साहेब तुमच्या पर्यंत पोहचवित असतो. आणि त्याच्यावर जर इतक बेजबाबदार उत्तर आल की तुमच्या वॉर्डातील चार लोकांवर कारवाई केली. त्यावेळेस मलाच खुप वाईट वाटल की मी पत्र दिल म्हणून ही कारवाई झाली की काय. परंतु असं न करता मा.महापौर साहेब, आज जे जे नगरसेवक बोलले खरतर अनेकवेळा मी हे सत्ता कुणाची आहे याला काही फरकच पडत नाही हे मला प्रामुख्याने सांगायचे आहे. आम्ही खुप वेळा सांगीतल की असं असं होतं मागच्यावेळेस आम्ही बोललो होते की जलपर्णी काढली हे झाल असं खुप आम्ही वेगळया गोष्टी केल्या या शहरासाठी परंतु वास्तविक आपण पाहीला गेलतर असं वाटत की आपण सगळे १३३ जण हातबल आहोत अधिका-यांची जी मानसीकता आपण बघीतलीना ती काहीतरी वेगळ करुन दाखवण्याची आणि आम्ही शहर बदलू शकतो की आम्ही तुमच्या सगळया बरोबर आहोतच त्याच बरोबर तुमची मानसीक तयारी असंण खुप आवश्यक आहे. आज अनेक नगरसेवक बोलले ती वस्तुस्थिती आहे. आम्हीतर पाच वर्षासाठी आहोत तुम्ही कायमचे आहेत आमच्यामध्ये पुन्हा नवा गडी नव राज्य अशी अवस्था आहे पण तुमची वर्षानुवर्षे ती पद असतात त्यांना हे शहर का कळत नाही. त्यांना का वाटत नाही की आपण जो काही पगार घेतो त्या पगाराच्या मोबदल्यामध्ये शहर विकसीत करुन देणं, या शहराला अदयावत करनं म्हणजे आपली जबाबदारी आहे. आम्ही निवडून येवून चार वर्षे झाली त्यावेळेस पासून सांगीतल होत की नाल्याच पाणी सोडल जातं. एसटीपीला पाणी विदावूट ट्रिट केलेलं सोडल जातं मग हे आपल्या अधिका-याना का कळत नाही. ज्यावेळेला आपण नदीला पाणी सोडतो त्याच्यामधला खरच पीएच चेक करायचा, आपल्या पिण्याच्या पाण्याचा सुध्दा दर्जा नाही. माझ्याकडे एका शिक्षकांनी खुप मोठ पत्र दिलं त्यांना मी घरी बोलवलं आणि ते पाणी चेक करुन दाखवलं. आपल्या पिण्याचा पाण्याचा सुध्दा दर्जा नाहीतर एसटीपीच्या पाण्याचा

दर्जा कोण राखतो आणि काय राखतो त्याच्याविषयी शंका आहे. साहेब, हे सगळ करत असताना राडारोडा असेल, एसटीपीच पाणी असेल नाल्यात सोडलेल पाणी असेल या सगळया वरती अत्यंत गांभीर्यपुर्वक काम केल पाहीजे. दोन नदीचा पट्टा आहे तुम्ही खरतर जी नदीच्या पात्राला लागून जागा असेल की ज्यांची कुणाची असेल त्याला मोबदला देवून ती जागा जर आपल्या ताब्यात घेतली आपण महानगरपालिकेनी तर तो एकदाच काय तो विषय ठरवा आणि त्याच्यावरती काम केल पाहीजे. जेणेकरुन नदीच्या पात्राशेजारची जी जागा आहे ती आपल्याला चांगल्या प्रकारे विकसीत करता आली पाहीजे. जर ती जागा माझी असेल त्याचा मोबदला महानगरपालिकेच्या नियमात बसत नसेलतर पालीकेच एक धोरण करा आणि त्या धोरणामध्ये आपण त्यांना काहीतरी मोबदला देवून ती जागा आपल्या ताब्यात घेवून त्याठिकाणी विकसीत करता आली पाहीजे. एवढच नाहीतर आपल्या इंद्रायणी नदीच्या कडेनी आपल्या पवना नदीच्या कडेनी आपल्याकड ड्रेनेजची लाईन टाकली जाते. मा.महापौर साहेब, मला अधिकारी फोन करतात की ताई आज आमक्या-तमक्यानी आडवली, त्या जागेचा मालक असेल किंवा शेतमालक असेल ते आमच काम अडवतात त्यामुळ पंधरा दिवस आमच कामच बंद आहे. ती ड्रेनेजची लाईन टाकत असेलतर तो चांगला प्रकल्प आहे तो केला पाहीजे आणि ती भविष्याची गरज आहे. मग त्याचवेळेला तुम्ही एरीगेशन बरोबर एक मिटींग घेतली पाहीजेल, शेतमालकाला बोलवल पाहीजे, एक लाईन आणून दिली पाहीजे आणि ही लाईन येथून जाणार आहे काही शंका असेलतर ती क्लेअर करा आणि तीथल्या तीथ विषय मिटवला पाहीजे. प्रत्येकवेळेला आमच्याकडे आलेतर आम्हांला पण तुमच्याशीच चर्चा करायची आणि तुम्ही ते नाहीच ऐकलतर म्हणायच मात्र नोटीस दया हेच सगळे विषय अत्यंत चुकीच्या पध्दतीने चालतात. शहरातील महत्वाच काम तुम्हांला हाती घ्यायच असेलतर, भविष्यात आपल्याला नदीपात्राचा विचार करायचा असेलतर तुम्हांला त्याचा आराखडा तयार करावा लागणार आहे आणि त्याच्यावरती अत्यंत पॉझिटीव्हली आमच्या १३३ जणांच्या बरोबर आणि अधिका-यांची एकदा बैठक घेवून काय काय कराव लागणार आहे त्याच्यावरती एक आराखडा तयार करायला पाहीजे त्यात मागच्या पाच वर्षात असं वाटत की नक्की कुठल्या टर्मला आपण नदी प्रकल्प हाती घेतलेला असेल आणि आपली चांगली नदी झालेली असेल. परंतु हे मागच्या टर्मलाही स्वप्नच राहील आणि दुर्देवाने गेली चार वर्षे सरले शेवटच्या वर्षात मला नाही वाटत की आम्ही काहीतरी वेगळ करु शकणार आहेत आणि शहराला म्हणू शकणार नाहीत की आम्ही नगरसेवक आहोत

आम्ही शहरासाठी नक्की चांगल केलं. तीथ तुम्हांला टेंडर काढण्याची गरज नाही फक्त कंपन्याना जरी आवाहन केलतरी, मग ती आल्फा लाव्हल असेल, सँडवीक कंपनी असेल हे सगळे तयार आहेत की आम्हांला ऐरीया सांगा, आम्हांला सांगा की तुम्ही एक कि.मी. चा ऐरीया डेव्हलप करायचा आहे त्याचा सगळा खर्च दयायला ते तयार आहेत फक्त तुम्हांला नेमक काय करुन हाव आहे म्हणजे आपल्या महानगरपालिकेच्या पर्यावरणाच्या डीपीआरमध्ये आपल्याला काय करुन घ्यायच आहे हे निश्चित करा. आपल्याला आनंदच आहे तुम्हांला पैशाची सुध्दा गरज लागणार नाही किंवा वेगळा खर्च करायची गरज लागणार नाही. त्यांच्या सीएसआर फंडात रक्कम आहे त्यातून हे दयायला तयार असतील असे याठिकाणी मी तुम्हांला सांगते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमच सांगवी गाव हे दोन्ही नदयाच्या मध्ये आहे ते एक बेटासारख गाव आहे. त्याच्या एका बाजुला मुळा नदी आहे आणि दुस-या बाजूला पवना नदी आहे. आम्ही याठिकाणी जेव्हा २०१७ ला निवडून आलो त्याच्यानंतर दिड वर्षे झाली सन्मा.मा.महापौर माई असतील आमचे सहकारी मित्र असतील, नगरसेवक संतोष कांबळे, नगरसेवीका सोनवणेताई हे सर्व उपस्थित होतो आणि तुम्ही आमच्या सर्व्हे नं. १ ममता नगरमधील राडारोडा पाहण्यासाठी आले होते. आयुक्त साहेब स.नं. १ मध्ये जवळ जवळ ५०० मी. आतमध्ये नदीमध्ये वीस फुट खालपासून ते वर पर्यंत जो राडारोडा टाकला ममतानगर भागामध्ये तो तुम्ही स्वतः डोळयानी पाहीला आहे. तुम्ही त्याठिकाणी संबंधित अधिका-यांना सांगीतल होत की हे कोणी जे केल असेल त्याच्यावरती एफआयआर दाखल करा ताबडतोब तो राडारोडा उचला पण याला दिड वर्षे उलटून झालेले आहेत. याठिकाणी अवर्जून तुम्हांला सांगावस वाटत की या भागामधील सर्व घर ही जूनी आहेत आणि नदीत एवढ अतीक्रमण झाल आहे याच्यामुळे त्या संपुर्ण भागामध्ये पावसाळयात एवढा भयानक परिणाम होतो. पावसाळयामध्ये पुर आलेला होता तेव्हा तुम्ही आलेला होतात. या राडारोडयामुळे त्यावेळेस ममतानगरमध्ये सगळीकडून पाणी घुसलेल होतं. ज्यावेळेस हे पाणी लोकांच्या घरामध्ये घुसले त्यावेळेस माई स्वतः तीथ होत्या आमचे सर्व नगरसदस्य होते तुम्ही स्वतः आलेले होते खुप भयानक परिस्थिती झाली होती. त्याठिकाणी एक विहीर आहे त्यामध्येही या नदीनाल्याच घाण पाणी त्याठिकाणी जातं याच्यावरती आयुक्त साहेब तुम्ही पर्यावरण खात्याला खुप कडक शब्दामध्ये

सांगीतल पाहीजे. पर्यावरण खात फक्त काही नावालाच आहे का. कुलकर्णी साहेबांना काहीही सांगीतल की ते आंग झटकून मोकळे झालेले असतात मग पर्यावरण खात्याचा उपयोग काय आहे ते खात बंद करुन टाकाना. फक्त टेंडर काढण्यासाठी ते खात आहे का. ते खात खरच बंद केल पाहीजे. त्या खात्याचा कुठल्याही प्रकारचा उपयोग नाही. तीथ अतीशय चुकीचा कारभार चालतो. हा राडारोडा अजून उचलला नसल्यामुळे तीथ अजून अतिक्रमण वाढत चाललेल आहे. तीथ उदया जर झोपडपट्टी बसली किंवा अतिक्रमण झालतर, कुणी बाहेरची लोक राहायला आलीतर आमच्या सांगवीमध्ये एक झोपडपट्टी सारख एक वातावरण तयार होईल. साहेब, तुम्ही याच्यावरती कडक कारवाई करावी हे आम्हांला अपेक्षीत आहे. तरी याच्यावर लवकरात लवकर कारवाई होईल अशी मला अपेक्षा वाटते. आपल्या भागामध्ये पवनानदी आणि मुळा नदी या दोन्ही नदया असल्यामुळे आमच्या सांगवीला दरवर्षी मच्छरांचा भयानक त्रास होतो. आता जानेवारी महीना चालू झालेला आहे आणि आमच्या भागामध्ये मच्छर वाढलेले आहेत मी रॉय सरांच्याही कानावर घातल आहे. तो पुर्ण पाला आताजर काढलातर नवीन पाला तयार होणार नाही याची पुर्णपणे तुम्ही दक्षता घ्यावी आणि तसं संबंधित अधिका-यांना सांगून आम्हांला यावेळेस मच्छरमुक्त सांगवी पाहीजे एवढीच तुम्हांला मी या प्रसंगी विनंती करतो आणि मला याठिकाणी बोलायची संधी दिली त्याबद्दल आभार मानतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पर्यावरण सद्दस्थिती अहवाल माझ्यापर्यंत तर अजून आलेला नाही. त्यामुळे आपण विषय तहकूब करावा म्हणून सगळया सदस्यानी मागणी केलेली आहे आणि निश्चितपणे सगळयांचा मागणीचा विचार करता आपण तो तहकूब करणार आहात. मंगलाताईनी सांगीतल की आम्ही पर्यांवरणाच्या विषयावर किती बोलायचं. आयुक्त साहेब या महानगरपालिकेचा पर्यावरण सद्दस्थिती अहवाल आणि पर्यावरण दुरदर्शी अहवाल तुमचा एका बाजूनी फोटो आणि आमचा दुस-या बाजुनी फोटो असायचा. आणि तुम्ही काय काय चुका केल्या त्या नेमक्या चुकांवर बोट ठेवायचो आणि त्यामध्ये सुधारणा सुचवायचो. मापक अपेक्षा तुमच्याकडन एवढीच होती की तो जर कित्ता तुम्ही सगळयानी गिरवला असतातर निश्चितपणे आमच्या डोळयात झणझणीत आंजन घातल असतं. कसं असतं भाऊसाहेब तुम्ही कुणी काही बोलतच नाही हे आम्हांला आम्ही गृहीत धरलेलं आहे. तुम्ही खुप वर्षे सत्ता राबवलेली आहे आम्ही याच पंचवार्षीकला आलोत. परंतु एकच निश्चितपणे कळल आहे की सत्तेत असणा-या

लोकांच्या बरोबर अधिकारी वर्ग असतो असं आजपर्यंत मानत होतो आता हाळू हाळू त्यामध्ये बदल व्हायला लागला आहे आणि म्हणून ज्या ज्यावेळेस विरोधी पक्ष विरोधी पक्षाची भूमीका पार पाडत नाही त्या त्या वेळेस सत्तेची धूंदी यायला सुरवात होते. तुमच सगळयांच अभिनंदन, मंगलाताई तुमच सुध्दा अभिनंदन, मनापासून की आज मला खरच खुप खंत वाटली की आपण काय केलय चार पाच वर्ष सत्तेत आलो म्हणजे असं तर नाहीना की महापालिकेच्या चुकांवरती बोलायचच नाही. मनापासून आभारी आहे मोठी बहीण म्हणून खरच तुम्हाला खुप आदर्श मानते भाऊसाहेब आणि तुमच आभार पण मानते की तुम्ही चांगल सांगीतल. आणि निश्चितपणे जरी आपला सद्दस्थिती अहवाल ज्यावेळेस कधी येईल सभागृहापुढे की हा विषय आज तहकूब केल्यानंतर त्यावेळी या पर्यावरणामध्ये काय काय चुका आहेत ते निश्चितपणे सांगेल. एक प्रामाणिक अपेक्षा आहे की त्यामध्ये अनेकप्रकारचे बदल आम्ही सुचवतो. आम्ही काही त्यातले तज्ञ नाही आहोत आम्ही सुध्दा अनेक तज्ञ लोकांना बोलावून त्यांना विचारतो त्यांचे मानांक तपासतो आणि त्याच्यावरती अभ्यास करुन तो मांडतो. आम्ही ज्या ज्यावेळेस पर्यावरणावरती बोलायचो त्या त्या वेळेस, पर्यावरण म्हणजे काय हे सोप आहे ठिक आहे नदी आहे, राडारोडा आहे, मच्छर होतात या सगळया गोष्टी इझीली घेतल्या जातात. ज्यावेळेस कोरोनासारखी महामारी आली आणि मग कळायला लागल की एका एका श्वासाच महत्व काय. म्हणजे मागच्या पंचवार्षीकला मी आणि आशाताई, भाऊसाहेब मगाशी तुम्ही म्हणालात की झाड कुठे लावतात माहीती नाही. तर त्या झाडाचा सर्व्हे करण्यासाठी अधिकारी लोकांची टिम घेवून आम्ही आयुक्तांना पत्र दयायचो, त्यावेळेस साळूंके साहेब होते उदयान विभागाचे अधिक्षक, अघोषीत सम्राट. त्यांना आम्ही पत्र दयायचो की साहेब आम्हांला ती जागा दाखवा की कुठे वृक्षारोपण मागच्या वर्षी केलं ते त्याची आम्हांला वृक्षगणना करायची आहे, कारण कोटयावधी रुपये खर्च व्हायचे. पत्र दिल्यानंतरही दोन-दोन, तीन-तीन महीने आमची व्हिजीट टाळल्या जायची. काहीही असू देत मग तीथ आम्हांला आंदोलन करायला लागल असू देत, आम्हांला तीथ वाईट बोलणं असू देत आम्ही ते सगळ करायचो आणि अधिका-यांना आम्ही बरोबर घेवून जायचो. त्यावेळेस उदयान अधिक्षक किंवा त्यांचा समकक्ष असणारा कुठलाही अधिकारी आमच्या बरोबर नसायचा मग आम्ही आपल जायचो एखादया ज्युनिअरला बरोबर घेवून, एखादी एजन्सी घेवून आणि मग ७० हजार झाड लावलीत मग ती कुठ लावलीत तर एकंदरीत क्षेत्र जर पाहीलतर त्याठिकाणी ७० हजार झाड बसतच नाहीत, लाख झाड बसतच नाहीत. मग

झाडाची किमंत काय, झाड किती फुटाचे आहेत पाच फुटाचे आहेत, चार फुटाचे आहेत, सात फुटाचे आहेत आणि लावलीत काय खुरटी. एक फुटाचे पण लावलेले नव्हते. काहीतर प्लॅस्टीकच्या पिशवीमध्येच असायचे. मग अशाप्रकारच बोगस बिलींग हे सगळे प्रकार झालेले आहेत आणि मनापासून इच्छा होती की त्याच्यामध्ये कुठेतरी सुधारणा व्हावी. चुका दाखवतो म्हणजे वाईटच हेतू आहे अशातला काही भाग नाही. परंतु त्याठिकाणी त्या चुका दाखवल्यानंतर त्याच्यावरती काय करेक्टीव्ह मेजर घेतले पाहीजेत किंवा काय घेतलेत हे आजपर्यंत कळलेल नाही. एखादया विषयाचा किती पाठपुरावा करायचा. कितीवेळा एखादयाला वाईट बोलायचं. सगळयाप्रकारच म्हणजे गॅसदाहीनी असू देत किंवा मगाशी आमच्या अजीतदादानी उल्लेख केला त्याठिकाणी असणा-या शवदाहीनीचा की सगळा धुर तो खालीच येतो, फॅक्ट आहे. भोसरीमध्ये तेवढी एकच स्मशानभूमी आहे आम्ही तीकडेच घेवून जातो. आम्ही बघतो काही त्याच्यामध्ये सुधारणा होत नाही. आता हे सगळे विषय परत जुन्या गोष्टीला नव्याने उजाळा देण्याचा आहे. परंतु विषय आसा आहे की हे वारंवार बोलत राहीलतर निश्चितपणे त्याच्यावर कारवाई केली जाते आणि म्हणून तुमच्याकडन अपेक्षा आहे. राडारोडा नदीच्या आतमध्ये टाकतात का. मगाशी संदिप वाघेरेनी सांगीतल की नदीची लांबी वाढवली गेली, आम्ही म्हणतो की नदीची रुंदी कमी केली. बरं कुणी केली काय केली हे वेगळ सांगायची गरज आहे का. आणि सगळ जर आम्हीच सांगायच तर मग तुमची टिम काय करते. आमची तर एकदम वाईट परिस्थिती आहे साहेब. “एका तळयात होती बदके अनेक सुरेख, तरी  त्यात वेगळे एक” त्यातले वेगळे आम्ही आहेत. आम्हीतर कुरुपच आहेतना आम्ही सत्तेत असलोतरी आम्ही चुका दाखवतो. आम्ही विरोधात होतो तरी आम्ही कुरुपच होतो पण आम्ही चुका दाखवत होतो तर तुमची लोक काय करतात. तुमची लोकतर काहीच करत नाहीतना मग आम्ही सांगायच इथ राडारोडा पडलेला आहे तो कुठ उचलून टाकायचा बघा. अरे, सगळी दुकानदारी आम्हीच करायची बरं तेही करु हे शहर आमच आहे, ही कर्मभूमी आमची आहे निश्चितपणे करायला आवडेल. आपल्या शहराला चांगल, सुंदर, स्वच्छ, पर्यावरणमुक्त बघायला कुणाला आवडणार नाही, आम्हांला आवडेलना. आपले अधिकारी बहाद्दर आहे याबाबतीत तर. मगाशी भाऊसाहेबांनी सांगीतल कुणी कुणाची तळी उचलायची हे माहीती आहे याच्यात आम्ही वेगळ सांगायची गरज नाही. तुमची नाळ तीथ बांधलेली आहे. आपण सगळयांनी सभागृहात समजून घेतल पाहीजे. आयुक्ताना कळत नाही पुढे गेलतरी वाइट बोलतात मागे आलेतरी वाईट बोलतात, जागेवर थांबलतरी वाईट बोलतात,

मग करायच काय. काही निर्णय घेतल्यानंतर आपल्याला एकदा कुठतरी थांबल पाहीजे. आम्ही आपल्याला सांगीतल साहेब की हे आमच इलेक्शन ईअर आहे या इलेक्शन ईअरला आम्ही कुठलही कुणाच काहीही ऐकूण घेणार नाहीत. आम्हांला आमच शहर चांगल पाहीजे आमच्या शहरामधल्या पर्यावरणाची हानी होत असेल, -हास होत असेलतर निश्चितपणे त्याकडे लक्ष वेधल पाहीजे. मगाशी पाण्याचा पुर्नरवापरा वरचा विषय होता. शहराची गरज आहे, यायला पाहीजे होता, या शहराला नवीन कुठलही पाणी मिळणार नाही. भामा-आसखेड, आंद्रा वर तुम्ही किती दिवस राहणार आहेत. शहराची लोकसंख्या वाढते आहे हे सत्य आहे आणि याच्यावर जर का विषय होत असेल हे तुम्हांला जर का लक्षात आल असेलतर त्यावेळी तुम्ही विरोध करायला पाहीजे होता. पण नाही केला, तीतक्या ताकदीने विरोध होत नाही हे आमच दु:ख आहे. आणि म्हणून मला तुम्हांला विनंती करायची आहे की निश्चितपणे अशा सगळया गोष्टीवर तुमचा आवाज उठला पाहीजे. पाण्याच्या पुनरवापरावरती काय करतो आपण हे आज नाही करत गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे. मी २००७ ला नगरसेवक झाले त्यावेळेस पासून आजूनपर्यंत मी नदीसुधारच ऐकते. नदी सुधारणार मग आम्ही इकडे अशी तशी खोली वाढवणार आहोत. मग आम्ही तीकडे वॉटरट्रान्सपोर्ट चालू करणार आहोत. खुप काही काही वेगवेगळी आम्ही स्वप्न पाहीलेले आहेत. त्यावेळेला जलसंधारण मंत्री होते मा.अजीतदादा पवार आम्हांला वाटल एकदम कार्यक्षम आहेत, डॅशींग आहेत शंभर टक्के होणार. दहा वर्षे झाले झालच नाही. आता परत सत्ता आहे परत तुमच्या हातात आहे. आतातरी मार्गी लावा जोपर्यंत राज्यशासनाची आम्ही मदत घेत नाहीत तोपर्यंत तो प्रकल्प आम्ही पुढे रेटू शकणार नाहीत. आणि जर तुम्हांला असं वाटत असेल की नदीची रुंदी वाढलेली आहे लांबी वाढलेली आहे तर निश्चितपणे त्यामध्ये जे तुमचे मंत्री आहेत त्यांच्याकडे आपण दाद मागू शकतो. तुम्ही मागा आम्ही पण तुमच्या बरोबर येवू दाद मागायला हे काय चाललेल आहे म्हणून आणि एकिकडे तुम्ही नदीच सर्व्हेक्षण करुन घेता, दुसरीकडे एमपीसीबी सारखी आपल्याकडे संस्था आहे ज्यांनी पर्यावरणावरती ख-या अर्थाने काम करायला पाहीजे ते काय करतात ते काहीच करत नाहीत. एमआयडीसीमध्ये त्यांचच चालत. त्यांनी कुठे कारवाई केली ते आपल्याला विचारत नाहीत आपल्याला सांगत नाहीत. आपले एसटीपी खराब झालेत त्याच्यावरती ते काही कारवाई करत नाहीत. मला वाटते से-२२ चा विषय सोडलातर बाकी कुठे कारवाई पण केलेली मला आठवत नाही. हे सगळे अनेक विषय राज्यशासनाशी निगडीत आहेत आणि त्याच्यावरती कुठेतरी एकदा

विचारमंथन आपण केल पाहीजे राजकारणतर आपण करतोच आहोत. परंतु राजकारणा बरोबर एक वेगळया मार्गाने सुध्दा त्याच्यावरती मार्ग काढण्याची गरज आहे आणि निश्चितपणे आपण सगळे मिळून हे शहर चांगल कस राहील याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मा.आयुक्त साहेब आता जर आपण गेलोत तर मेट्रोच आता जे काही काम चाललेल आहे आणि त्यांनी खरच जो काही राडारोडा आहे तो कुठे नेऊन टाकला आहे याच्यावरती आपला अभ्यास होणं फार गरजेच आहे. त्यामुळे नदीची खोली जी आहे ती कमी केली. पर्यायाने काय झाल तुम्ही सगळे नदीचे किनारे बघा माझ्याकडे मागच्या पंचवार्षीकचे पण फोटो आहेत त्याठिकाणी त्यावेळेला नदीचे काट मोकळी होती आता जर गेलातर तीथे भर पडली आणि भर पडून त्याठिकाणी आता नवीन वस्ती उदयास येते. हॉटेल्स येतात, भंगारचे दुकान आहेत सगळच होतय. आणि तक्रार केल्यानंतर आपल्याकडे एकदम घाणेरडी सवय आहे की नावानिशी कळवल्या जातं. म्हणजे काय एकतर जावून मॅनेज कर नसेलतर त्याला दोन चार शिव्या दे. हे दोनच प्रकार त्यातन होवू शकतात, आणि त्यामुळे साहेब काम करणं खुप कठीण आहे. असं वाटायला लागल की किती लोकांची दुष्मनी घ्यायची आणि का घ्यायची. दुसरा एक विचार येतो की मी जर आज थांबले तर उदया माझ्या नातवाला काय उत्तर देणार आहे. तु तर डोळस होती तुलातर वाटत होत खुप शहाणी आहे म्हणून मग तु का नाही बोललीस या विषयावरती आणि म्हणून बोलाव लागत साहेब. नुसत विषयाला विरोध म्हणून विरोध नाहीतर काही गोष्टीमध्ये निश्चितपणे बदल घडले पाहीजेत म्हणून सांगते. यामध्ये ज्या ज्या सबंधित अधिका-यांची डयुटी आहे, जबाबदारी आहे त्यामध्ये त्या त्या अधिका-यांनी काय कारवाई केली, काय काम केलं कुचराई कुठे केली त्यांच्यावरती कारवाई पण करा. मी तर मागच्या दहा वर्षात संजय कुलकर्णीना एवढ बोललेली आहे की त्यांच निलंबन व्हायच बाकी राहील होतं. त्यावेळेस अनेक लोक याच सभागृहातले संजय कुलकर्णी यांची बाजू घ्यायचे, काय बोलणार. आम्ही तर आजही टिकाच करतो आणि आम्ही तेव्हाही टिका केली. आमचे जरी हातपाय बांधलेले असलेतरी आमच तोंड मोकळ आहे त्यामुळे आम्ही बोलतो आम्ही बोलणं थांबवत नाहीत. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी त्यांची बाजू घेतली होती त्यांनी पण एकदा विचार करण्याची गरज आहे. आज त्यांना त्याठिकाणी काम करायला जमत नसेलतर मगाशी तुषार कामठे यांनी एक विषय मांडला त्या विषयाच्या संदर्भात काय समजा आपल्या प्रशासनाने काही अधिका-यांना ट्रेनिंगला पाठवल असेल, अगदी विदेशात पाठवलेल आहे आम्हांला अभिमान आहे त्याठिकाणी जावून त्यांनी

उच्च शिक्षण घेतल मग त्या लेव्हलच आपण आपल्याकडे एखाद खात आपण निर्माण केलं आहे का, त्यांना ती जबाबदारी दिली आहे का, नाही दिली. आमच्या उषा मुंढे आहेत त्यांना अध्यक्षपद दिल आहे. अध्यक्षपद देवून काय केल साहेब त्यांच्याकडे काहीच पोर्टफोलीओ नाही मग निश्चितपणे त्यांच्यावरती लोक टिका करतात. आता आमच्या आई साहेब बोलल्या गोरखेताई अत्यंत सुंदर त्या बोलल्या आणि त्यांनी तर कमिटी बरखास्तीची मागणी केली. आपण पोर्टफोलीओ देत नाही त्यांना त्यांचे अधिकार जर सांगत नसतीलतर, त्याची अंमलबजावणी होत नसेलतर अशा कमीटया सुध्दा काही कामाच्या नाहीत. मग हे शहर त्या अधिका-यांच नाही का आणि नसेलतर त्यांना बाहेर टाका तीथ नवीन कोणीतरी नेमा. मा.महापौर साहेब, आपणास विनंती आहे की हा विषय आपण तहकूब करावा आणि त्या विभागाला आपण सक्त ताकीद दया, पर्यावरण अहवाल हा येणार हे त्यांना आज माहीती नव्हतं तर त्यांना दरवर्षी माहीती असतं की कुठल्या तारखेला आपल्याला पर्यावरण सद्दस्थिती अहवाल दयायचा असतो, तो तुमच्या हास्ते, आयुक्तांच्या हास्ते, स्टॅण्डींग चेअरमनच्या हास्ते त्याच विमोचन होत असतं हे त्यांना माहीती असतं आणि सगळया नगरसदस्यांना, पत्रकारांना, या शहरातले जे पर्यावरणप्रेमी नागरीक आहेत त्यांना हा अहवाल आठ दिवस, पंधरा दिवस आदी कसा मिळेल याच्याकड आपण लक्ष दिलं पाहीजे. तरी हा विषय आपण तहकूब करावा एवढच याठिकाणी सांगते, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता आपण पर्यावरणाच्या अनुषंगाने सर्वजण सभागृहात बोलत आहोत. खर पाहता विषय क्रमांक ४ वर आपण चर्चा करायला पाहीजे होती परंतु माझ्या आदिच्या सहकार्याने सांगीतल. त्याचप्रमाणे किती कोटीची काम झटापटीने मंजूर हातील आणि मंजूर मंजूर म्हणून पुढे जायच कुणाला बोलू दयायच नाही, आता बोलू दिल्याबद्दल धन्यवाद. वास्तविक पाहता वि.क्र. ४ हा पिंपरी चिंचवड शहरातील सांडपाण्यावर शहरातील विविध मलनि:सारण केंद्राव्दारे प्रक्रिया केली जाते. सदर मलनि:सारण केंद्रामधून बाहेर पडणा-या प्रक्रियायुक्त पाण्यावर पुढील प्रक्रीया करुन शहरातील औद्योगिक तसेच निवासी भागात पाणी पुरवठा करण्याकरीता [Recycling & Reuse] सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा तयार करण्यात आला असा एवढा मोठा विषय आपण मंजूर केलेला आहे.

**मा.महापौर -** वि.क्र. ४ हा आपण तहकूब केलेला आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. तहकूब केलेला आहे का तर माझी एक यामध्ये अशी विनंती आहे की ज्यावेळेला आपण याची विशेष सभा घेणार आहेत त्या विशेष सभेमध्ये याच्याबद्दलचा नेमका काय आराखडा आहे तो पण त्या दिवशी सादर करावा. तो जर सादर केलातर याच्यामध्ये काही सुचना करता येतात का, याच्यामध्ये काही बदल करता येतात का हे सुध्दा बघण तीतकच उचित राहील. शेवटी माझी एक आपल्याला अशी विनंती होती की महापालिकेतील जी काही काम आहेत ती सल्लागाशिवाय आपण कामच करत नाहीत. आपल्या अधिका-यांची सिनॅरीटी त्यांचा अभ्यास, गेल्या वीस-पंचवीस वर्षामध्ये त्यांनी घेतलेल प्रमोशन हे सगळ व्यर्थ आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये आपल्याला कन्सलटंट लागतो, प्रत्येक गोष्टीमध्ये आपल्याला सल्लागार लागतो. माझी आपल्याला विनंती आहे की सर्व सभागृहाने एवढया पोटतीडकीने विषय मांडलेला आहे मला वाटत की आपला नाला स्वच्छ करण्यासाठी एक कन्सलटंट, रोड व्यवस्थित स्वच्छ होतात का नाही त्याला एक कन्सलटंट, एसटीपी ऑपरेट होतात का नाही त्याला एक कन्सलटंट. मग आपल्या अधिका-यांनी काही कामच करायचे नाही आणि विशिष्ठ एखादया अधिका-या बद्दल बोलून पण काही अर्थ नाही. सगळयाच म्हणणं तेच आहे की अधिकारी काम करत नाहीत. माझी मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की बिल्डींग बांधायची तर कन्सलटंट, मोठा रोड करायचा तर कन्सलटंट मला वाटत हे सर्व करण्यापेक्षा या शहराची स्वच्छता कशी राहील, स्वच्छतेसाठी अजून दहा कन्सलटंट नेमायचे असतीलतर नेमा परंतु लोकांना स्वच्छता असली पाहीजे. शहर ढासमुक्त असल पाहीजे, शहर स्वच्छ असल पाहीजे. आपण वृक्षारोपण करतोत तर मग वृक्षारोपणासाठी पण कन्सलटंट ठेवा. दुसरी गोष्ट अशी आहे की आपण एकतर एजन्सी ठेवलेली आहे झाड काढण्यासाठी तर ती झाड अशी काढतात की एखाद धोकेदायक झाड असेल, उंच नारळाच झाड असेलतर ते काढा म्हणलतर ते म्हणतात आमच काम नाही. परंतु ज्याचे फांदया, बुंदे विकायला मिळतात अशा पध्दतीच झाड असेलतर पटकन काढून घेतात. म्हणजे आपण त्या कॉन्ट्रॅक्टरला कोणत्या नियमान नेमल आहे ते पण माहीत नाही. मग मोठमोठी झाड की ज्याची लाकड वापरता येतात अशी झाड आपण नगरसेवकांनी तक्रार करुन सुध्दा ती काढली गेली पाहीजेत ती काढली जात नाहीत आणि बाकीची झाड मात्र कुणी फोन जरी केला तरी मग वृक्ष समितीची मान्यता असो किंवा नसो अशाप्रकारची मोठमोठी झाड सुध्दा काढली जातात. अशा परिस्थितीमध्ये पर्यावरणामधली लोक

काम करतात वृक्ष प्राधिकरण समितीच्या लोकांच ते किती मिटींगमध्ये लक्ष घालतात किंवा काय त्या विभागाचा कोण अधिकारी आहे तो काय करतो हे सर्व पाहणे गरजेच आहे, धन्यवाद.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मला वाटत जवळपास दिड तास या पर्यावरणाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. सर्वात महत्वाच म्हणजे महाराष्ट्र प्रदुषण बोर्डाने आपल्याला काही त्रुटीबाबत दंड केला आहे का याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. मंगलाताईनी या विषयाला सुरवात केली आणि त्यांनी मागणी पण केलेली आहे, भाऊसाहेब भोईर सुध्दा बोलले. माझी विनंती आहे की मा.महापौर साहेब याच्यासाठी विशेष सभा फक्त पर्यावरणावर व्हावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता जो पर्यावरणाचा विषय झाला तो मला खर म्हणजे त्रास वाटतो की आता म्हणल्याप्रमाणे इतके झाडे लावले. ब-याचवेळा आम्हांला परमीशन घ्यावी लागली की झाडे लावायची आहेत पण जे खरोखरच गरजेचे झाड आहेत त्यामध्ये नियम आणि अटीमध्ये आम्ही आडकतो. आमच्या तीथे वर्माजी राहतात, ताई आहेत त्या अक्षरशः वारल्या. हार्डीकरांना ब-याचवेळेस मी म्हणले वाटल्यास तुम्ही व्हिजीट दया. पालिकेचे अधिकारी असतील बी.एम.गायकवाड, पी.एम.गायकवाड, साळूंके असताना सुध्दा त्यांनी व्हिजीट दिली. काही काही झाड जी आहेत ती जूनी आहेत जे की घरामध्ये जातात, घराच्या बेसीनमधुन, अंगणामधुन जातात त्यामुळ त्यांना दरवर्षी बेसीन बदलाव लागतं, बाथरुम बदलाव लागतं. म्हणून म्हणून सुध्दा झाड कापल्या गेल नाही. आम्ही त्यांना एवढ पण सांगीतल की हे जी झाड लावलेली आहेत त्यातले जे झाड जुनी झालेली आहेत ते आम्ही काढतो आणि तेथे पिंपळ, वड ज्यांनी पर्यावरणाचा –हास होणार नाही ते झाड आम्ही लावतो आहोत तर ती सुध्दा मला परमीशन मिळाली नाही आणि ती बाई वारली पण वर्माजीच झाड कापता नाही आल. बहलजीने म्हणल्याप्रमाणे नारळाच्या झाडाला अक्षरशः वाळवी लागलेली असते. हार्डीकरजी क्षमा असावी मी आपला उल्लेख केला नाही, मा.महापौरताई मी आपला उल्लेख केला नाही डायरेक्ट बोलायला लागले. सभागृहातील माझे सगळे सहयोगी. पण खरोखर यांना त्रास आहे आम्हांला सांगाव लागत की खरोखर हे झाड खराब झाल त्याला वाळवी लागलेली आहे पण त्याच काही मिळत नाही म्हणून

आपले पालीकेचे अधिकारी ते अजीबात काढत नाहीत. साळूंके बरोबर एकनाथजी होते आणि हार्डीकरजी होते तेव्हा मी चार वेळा साळूंकेना सांगीतल त्यांनी पण काढल नाही. पण एवढ मी म्हणेल हार्डीकरजी आता कोव्हीडमध्ये आपण जे काम केल किंवा आपली जी टिम होती त्याला आम्ही सगळेजण नतमस्तक आहोत. पण आपले जे टिमवर्क आहे मग ते पर्यावरण असु देत किंवा काहीही असु देत, पाण्यासाठी मी तुम्हांला फोन केला तरी याच्यामध्ये तुम्हांला लक्ष घालणे खुप गरजेचे आहे. हे म्हणणार नाही की आमच अधिकारी ऐकत नाहीत, ऐकतात पण ते टाळाटाळ करतात. दुसरी गोष्ट मी तुम्हांला कुत्र्याच सांगीतल, पर्यावरणाचा विषय इथे थांबता कामा नये. रात्री मला अहवाल आला, यांची तीसरी, चौथी टर्म आहे म्हणून त्यांनी एवढातरी वाचला पण मी अजीबात तो वाचलेला नाही म्हणजे त्याबाबतीमध्ये मी शुन्य आहे असे म्हणायला मला हरकत नाही. तो अहवाल यांनी म्हणल्याप्रमाणे आम्हांला आठ दिवस आदि यायला हवा होता. आम्ही जे नवीन लोक आहोत त्यांना तो अहवाल नुसता वाचून चालणार नाही तर जसे आपण मा.शरद पवारांची पुस्तक वाचली, मा.अटल बिहारींची पुस्तक वाचली. तो अहवाल आम्हांला चाळून चाळून वाचावा लागेल म्हणजे पस्तीस वेळा वाचू तेव्हा आम्ही मिटींगमध्ये काहीतरी बोलू शकू, म्हणून याला पंधरा दिवसाचा अवधी दया आणि एक मिटींग घ्या. कुत्र्यांचा मागच्यावेळेस विषय झाला आपण खर म्हणजे कुत्र्याला जगवायला पाहीजे मी नाही म्हणत नाही. हार्डीकरजी मला माझ्या प्रभागामध्ये क्षमा मागावी लागते की मी डुकर पकडू शकते की ज्याला किमंत आहे मग माणसाला खरच किमंत नाही का. पालीका पाण्याचे बील वाढवणार हे करणार, ते करणार, टॅक्स वाढवणार त्यासाठी पुर्ण शहराची जनता त्याला ऍक्सेप्ट करते कारण त्यांना माहीती आहे की ही विहीर जी आहे त्याला थोडेच झरे आहेत, खुप सारे झरे नाहीत की आपण सगळयानी पाणी उपसलना त्या झ-यातून पाणी मिळेल का पैसा मिळेल. जेव्हा पालीकेला टॅक्स स्वरुपामध्ये आम्ही देवू तेव्हाच पालीका सोई करु शकते हा पुर्ण शहराचा प्रश्न आहे. जसं गाईसाठी आपण पांजरपोळला करतो आहोत तस कुत्र्यांच कराव असं मी सांगते. आम्ही चौघाही नगरसेवकांना लोकांच्या सहया घ्याव्या लागतील की कुणा कुणाला कुत्र्यामुळे त्रास आहे. तरुण पोरांना पुर्ण अपंगत्व आलेल आहे. मला ही गोष्ट वाईट वाटते की आपण कुत्र्यासाठी काही नाही करु शकत, का नाही करु शकत त्यांच्यासाठी सुध्दा पांजरपोळला व्यवस्था करावी. मी असं म्हणणार नाही की हे डॉक्टर वाईट आहेत पण दगडे म्हणजे दगडासारखेच दगड आहेत. त्यांना सारख सांगीतल तरी कळत नाही त्यांना बोलवा आणि

डिसमीस करा. इतकी नसबंदी केली म्हणतात त्यासाठी इतका खर्च केला म्हणतात मग ही संख्या कशी काय वाढते. यापुढे सुधारणा झाली नाहीतर पालीकेमध्ये काळया फिती लावून थांबेल. मग तो कुत्र्याचा विषय म्हणा किंवा पर्यावरणाचा विषय म्हणा. पर्यावरण म्हणजे तुमच आमच सगळयांच जगण आहे आणि त्या जगण्याला आपण इतक गांभीर्याने घेत नाहीत. आता कोरोनासारखा आजार झाला त्यानंतर पर्यावरणाच्या माध्यमातून दुसरा आजार होवू शकतो. म्हणजे आपण ही टिम वाढवणार दवाखाने मोठमोठे बांधणार पण हे सगळ होवूनही आपल्याला पर्यावरणाच संतुलन राखल पाहीजे तर या सगळया गोष्टी होणार नाहीत. सगळे म्हणल्याप्रमाणे मी असेच म्हणेल मी नवीन आहे, पण ठेकेदाराची भरती जास्ती होते. हार्डीकरजी तुम्ही कोव्हीडला खर्च केला मी नतमस्तक आहे, सगळे पालीकेचे लोक नतमस्तक आहेत. पण याच्यामध्ये तुम्हांला काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. एक अजून मी विषय बोलले काय होते आमच्याकडे की पाण्याची पाईपलाईन... ऐकूण घ्या नियामामध्ये आणि अटिमध्ये सारखे आम्हांला अडकायच नाही. नाहीतर नियम अटीसाठी पालीकेला खरच सांगते तुमच्या कार्यालयाला मी कुलूप लावेल. आमच्याकडे पाण्याची लाईन आहे, आडीच फुटपर्यंत आहे त्याच्या खाली असेलतर आम्ही बदलणार. २४X७ जी आहे ती मला अजीबात आवडलेली नाही. २४X७ आपण काम करणार आणि ती वर्षभरानंतर पाणी येणार आहे. पण हा जो सात आठ वर्ष आम्हांला त्रास झालेला आहे तो कोण भोगणार. त्यांना म्हणल ही लाईन जर पाच ते सहा घरी येत नसेल. एलआयजी सोसायटीमध्ये दाट वस्ती आहे त्यांना पाणी मोठया प्रमाणात चांगल यायला लागल आहे. पाणी एक दिवसाआड आहे आम्ही त्यांना समजावून सांगतो. त्यादिवशी मी म्हणले सात आठ घरामध्ये पाणी येत ते उंचवटयावर आहे आम्ही ते बघणार नाही एक दिवसात साडेसातशे ली. पाणी येते म्हणजे तुम्हांला तीन ते साडेतीन हजार ली. पाणी येत म्हणजे सफिसिएण्ट पाणी आहे. आम्हांला क्वॉन्टीटीने पाणी नको आम्हांला क्वॉलीटीने पाणी पाहीजे. आम्हांला प्रेशर जास्ती हवं. मी आपल्याला म्हणल होत की तुम्ही टकले यांचेशी बोला, तुम्ही कुंभार यांच्याशी बोला मी त्यांच्या चार व्हिजीट घेतल्या त्यांनी मला सहकार्य केल नाही. आता मी त्या सहा घराची स्वतःच्या खर्चाने पाईपलाईन करणार. एखादया ठिकाणी उंचवटा आहे तर करायला काय हरकत आहे. आपण म्हणलात मी अहवाल मागवतो, त्यांना बोलतो, काहीतरी करतो, काही केल का आपण हार्डीकरजी. शहरातले प्रश्न आहेत त्यापैकी कुत्र्याचा प्रश्न पहीला सोडवा

नाहीतर मी सत्ताधारी असताना सुध्दा आपल्याकडे मोर्चा आणीन, एवढ बोलून थांबते, मला बोलू दिल त्याबद्दल धन्यवाद.

**मा.महापौर -** सन्मा. सभागृह. पर्यावरणाचा विषय महत्वाचा आहे. "झाडे लावा झाडे जगवा, मोकळा श्वास घ्या", भरपूर ऑक्सिजन शहरवासियांना दया. असं मी सर्वांच्या भावना लक्षात घेवून आयुक्त साहेबांना सांगते की सर्वांना एकत्रीत घेवून या विषयी परत स्पेशल सभा बोलवावी. आता ब-याच जणांनी हा विषय पोटतीडकीने याठिकाणी मांडलेला आहे तरी आयुक्त साहेबांनी त्यावर खुलासा दयावा. मंगलाताईनी व ब-याच जणांनी सांगीतले आहे त्यामुळे आपण हा विषय तहकूब ठेवणार आहोत. खुलासा पुढच्यावेळेस दिलातर चालेल का. ट्रेनिंगला गेलेल्या तीन अधिका-यांचा खुलासा दयावा.

**मा.लोणकर (उपआयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. महापालिकेमार्फत दोन कनिष्ठ अभियंत्यांना पर्यावरण विषयक ट्रेनिंगसाठी पाठवण्यात आलेल होतं. त्याच्यामध्ये श्री. संदेश खडतरे आणि सोहन निकम असे दोन अधिकारी होते. पर्यावरण विभागाच्या संबंधित ट्रेनिंगसाठी त्यांना पाठवण्यात आलेल होतं. त्यापैकी श्री.संदेश खडतरे आता नगररचना विभागात काम करतात तर श्री. सोहन निकम आता उपअभियंता म्हणून ब प्रभागामध्ये काम करतात. पर्यांवरण विभागासाठी जे उपअभियंता पर्यावरण विभाग म्हणून निर्माण झालेले पद आहे ते पद आता ११ फेब्रूवारी २०२० ला नव्याने निर्माण झालेले आहे. त्याच्यावर भरतीची प्रक्रीया चालू केलेली होती पण त्यामध्ये पर्यावरण विभागामध्ये ज्यांनी शैक्षणिक अर्हता धारण केलेले उपअभियंता पदावरचे काही कर्मचारी आहेत आणि काही कनिष्ठ अभियंता पदावरचे कर्मचारी आहेत. त्या दोघांवरुन कोणाला त्याठिकाणी दयायच यासाठी आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. पदोन्नतीने पद भरायचे की उपअभियंता पदावर ज्यांना महापालिकेनी शिकवलं आहे त्या अधिका-यांना त्या पदावर नेमणुक दयायची याच्या मार्गदर्शनासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. महापालिका ठराव क्र- ४९९ दि.२०/१/२०२० नुसार संभाजी ऐवले साहेबांचा एक ठराव केलेला होता महानगरपालिकेचे त्यात सगळे विषय झाले मग यांचाच का पेन्डींग विषय ठेवला आहे आपण आजपर्यंत. महासभेनी तो ठराव पास केलेला आहे मग त्यांचा

तो विषय का केला नाही मग महासभेला काही महत्व नाही का. त्याचा पण विचार करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. पर्यावरण सद्स्थितीबाबत अहवालावरती चर्चा ज्यावेळेला होईल त्यावेळेला सविस्तर खुलासा विभागाच्या वतीने देण्यात येईल. आता जो केवळ त्यातला एक प्रश्न आहे की महानगरपालिकेनी काही अभियंत्यांना पर्यावरणाच्या उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवल होतं. त्यांच्या सेवा पर्यावरण विषयासाठी का वापरल्या जात नाहीत असे विचारले आहे. आतापर्यंत महानगरपालिकेमध्ये पर्यावरण विषयक फक्त कार्यकारी अभियंता पर्यावरण हे एकमेव पद उपलब्ध होतं. दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपलिकेनं राज्यशासनाकडे आकृतीबंध आणि सेवाप्रवेश  नियम करुन प्रस्ताव पाठवला असता फेब्रूवारी महीन्यात आपल्या उपअभियंता पर्यावरण आणि सहशहर अभियंता पर्यावरण या पदाची निर्मीती करण्यात आलेली आहे. मात्र सेवाप्रवेश नियम जे बनवण्यात आलेले आहेत त्याच्यामध्ये कनिष्ठ अभियंता या संवर्गातून पर्यावरण विषयांतर्गत एमई किंवा एमटेक केलेले अशी अर्हता धारण करणा-यांना पदोन्नती देण्याच प्रावधान त्याच्यामध्ये ठेवण्यात आलेल आहे. मात्र डीपीसी ज्यावेळेला घेतली त्यावेळेला एक प्रसंग निर्माण झालेला होता की आपल्या इथे पीडी कॅडरमध्ये एकत्रीत जेई असं दाखवण्यात आलेलं आहे. जेई या संवर्गामध्ये या पदासाठी अर्हताकारक जेई जर सिनीअरमोस्ट नसेलतर ज्यूनीअर जेई सिनीअरच्या आदि पदोन्नत होतील आणि त्यामुळे जे सिनीअर आहेत त्यांना डावलल जावून ते भविष्यामध्ये मानीव दिनांक मागतील अशाप्रकारची स्थिती निर्माण होवू शकत होती. अशा परिस्थितीमध्ये समावेशनाचा जो पर्याय आहे तो प्रशासनाकडे उपलब्ध आहे मात्र सेवाप्रवेश नियमामध्ये तशी तरतूद नसल्यामुळे त्या संदर्भात सुधारणा करण्याच्यासाठी आणि मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव राज्यशासनाकडे पाठवण्यात आलेला आहे. ज्यावेळेला संवर्ग निर्माण होतो त्यावेळेला पहील्याप्रथम कनिष्ठम पातळीपासून वरिष्ठम पातळीपर्यंत सर्वत्र संवर्ग स्थापन होत असताना एकच नियमावली सर्वच पातळयांवरती राबवावी लागेल आणि यामुळे जर कनिष्ठ अभियंता पातळीवरती जर पर्यावरण संवर्ग स्थापन झालातर त्याठिकाणी समावेशन करत असताना डेप्युटी ईजिनीअर, एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअर आणि जॉईट सिटी ईंजिनीअर या सर्वच स्तरावरती सुध्दा तोच नियम लावावा लागेल पर्यायाने जे आपल्याकडे महानगरपालिकेनी प्रशिक्षण दिलेले डेप्युटी ईंजिनीअर ऑलरेडी प्रमोट

होवून अन्य पदांवरती कार्यरत आहेत त्यांना देखील समावेशन करुन घेता येवू शकेल. मात्र यासाठी सेवाप्रवेश नियमांमध्ये तशी तरतूद करुन घ्यावी लागेल आणि यासाठीच प्रस्ताव राज्यशासनाकडे पाठवलेला आहे. तशी सुधारणा केल्यानंतर त्यांच्याकडन त्यांच्या ज्ञानाप्रमाणे आपण त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेवू शकू. सभागृहाला सविनय सादर.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपण सांगीतल त्याबद्दल धन्यवाद. मला याच्यामध्ये अज्ञान आहे, आपण जेव्हा हे दोन लोक पाठवले तेव्हा अजून एक व्यक्ती पाठवला होता, वाहतूक विभागामधुन त्यांना आता त्यांची पोस्ट दिलेली आहे मग तीथ हा नियम लागू होत नाही का. तीन लोक आपण ऍटॅटाईम पाठवले होते, वाहतूक विभागा मधुन त्यांना त्यांची जागा दिलेली आहे पण या दोघाना दिली नाही मग हा नियम यांना का लागू होत नाही.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. ज्यावेळेला आपण एका अधिका-याला उपअभियंता वाहतूक अस काम दिल त्यावेळेला सेवाप्रवेश नियम होण्याच्या पुर्वी आपण वाहतूक हे कामकाज आपल्याला कराव लागत होत म्हणून अतिरीक्त एक तसा संवर्ग आपण अंतर्गत तयार केला आणि त्यांच्या सेवा त्याठिकाणी वापरायला सुरवात केली होती. पण तशी व्यवस्था आतापर्यंत निर्माण केली गेलेली नव्हती. आपण अन्य उपअभियंत्यांच्या माध्यमातून पर्यावरणाच काम आतापर्यंत करत आलेलो आहोत त्या पध्दतीने आपण करुन घेत होतो. परंतु आपल्या इथे वाहतूक विभागच नव्हता आणि वाहतूक विभागाच कामकाज वाढत असल्यान जो अर्हताधारक होता त्याला आपण ते काम देवून त्याच्याकडून काम करुन घ्यायला सुरवात केलेली होती आणि मी निवेदन दिल्याप्रमाणे हा संवर्गाचा पेच सॉल्व्ह झाल्यानंतर आपल्याला हे जे कर्मचारी ऑलरेडी ट्रेंड आहेत त्यांच समावेशन या पदावरती करुन घेणं शक्य होणार आहे.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. वाहतूकी बरोबर हा सुध्दा विभाग आपल्याला महत्वाचाच होताना. तुम्हांला एक महीना आहे त्यांना आता आपण ही जबाबदारी देवू शकत नाहीत का. त्यांना तीथच का पाहीजे ती जागा. लोणकर साहेबांच म्हणण होत की ती जागा ते लोक सोडायला तयार नाहीत. ते काही जावाई नाहीतना तीथ बसलेले. ज्यांना शिक्षणासाठी पाठवल पैसे घालवले

त्यांना तीथे बसू दयातना. म्हणजे तुम्ही एकाला एक नियम लावता दोघाला एक नियम लावता असं नाहीनां होत. मग तुम्ही त्यांच्या बदल्या केल्या पाहीजेना. आयुक्त साहेब याच्यामध्ये तुम्ही काहीनां काही ॲक्शन घेणं महत्वाच आहे.

**मा.उत्तम केंदळे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** आयुक्त साहेब याच्यामध्ये माहीती घ्यावी आणि त्यांनी जे काही प्रश्न विचारले आहेत त्यांना व्यवस्थीत समाधानी उत्तर मिळाले पाहीजे. विषय कमांक १२ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५९५ विषय क्रमांक- १२

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचेकडील जा.क्रपअक/०३/कावि/०३/२०२१
दि.११/१/२०२१

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५९६ विषय क्रमांक- १३

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/०३/२०२१,
दि.११/०१/२०२१

धन्वंतरी स्वास्थ्य योजना विभागाचे सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात विमा निधी लेखाशिर्षावर ७ कोटी तरतुद शिल्लक आहे. दि न्यु इंडिया एशोरंन्स कंपनीला वैद्यकीय विम्यासाठी क्र.वैद्य/१४अ/कावि/१/२०२१ दि.०४/०१/२०२१ अन्वये कामकाज आदेश दिलेला आहे. विमा कंपनीस र.रु.२७,८४,७८,६०८/- आदेशानंतर देय

आहे. तथापि तरतुद फक्त ७ कोटी शिल्लक आहेत. पाणीपुरवठा विशेष योजना निधीतील तरतुदींमधून र.रु.२१ कोटी वर्ग करणे गरजेचे आहे. सदर वर्गीकरणाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | पान क्र. अ.क्र. | कामाचे नाव | सन २०२०-२१ मुळ तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धन्वंतरी | २३५/१ | वैद्यकीय विमा | १४ कोटी | २१ कोटी | - |
| २ | पाणीपुरवठा विशेष योजना | २३९ ५ इ (I) | आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे उभारायच्या जलशुध्दीकरण केंद्रासाठी देहू येथून नदीतून जलउपसा करुन पाईपलाईनद्वारे पाणी आणणे व इतर तद्अनुषंगिक कामे करणे i) या कामांतर्गत देहू (बोडकेवाडी बंधारा) येथून जलशुध्दीकरण केंद्र चिखलीपर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे | २२ कोटी | - | ५ कोटी |
| ३ | पाणीपुरवठा विशेष योजना | २४० पॅकेज २ | चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वीत करणे | ७ कोटी | - | ६ कोटी |
| ४ | पाणीपुरवठा विशेष योजना | २४० पॅकेज ३ | वाकड थेरगाव से.७/१० व भोसरी या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ७ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे १ पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे | ७ कोटी | - | ६ कोटी |
| ५ | पाणीपुरवठा विशेष योजना | २४० पॅकेज ४ | किवळे, से.९६, पुनावळे व ताथवडे या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, २ शुध्द पाण्याच्या टाक्या व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वीत करणे | ७ कोटी | - | ४ कोटी |
| | | | **एकूण** | | **२१ कोटी** | **२१ कोटी** |

वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे तातडीने वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.
**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५९७ विषय क्रमांक- १४

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

## समित्यांचे अहवाल

## मा.विधी समिति

**अ)** कार्यपत्रिका क्रमांक १६ दि.१५/०५/२०२०, ०८/०६/२०२० व १२/०६/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** कार्यपत्रिका क्रमांक ०१ दि.२३/१०/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नितीन (आप्पा) काळजे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५९८ विषय क्रमांक- १५

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

## मा.महिला व बालकल्याण समिती

**अ)** कार्यपत्रिका क्रमांक १६ दि.०८/०६/२०२० व ११/०६/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** कार्यपत्रिका क्रमांक ०१ दि.२३/१०/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क)कार्यपत्रिका क्रमांक ०२ दि.१०/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. मा.नितीन (आप्पा) काळजे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५९९ विषय क्रमांक- १६

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

## मा.शहर सुधारणा समिती

अ) कार्यपत्रिका क्रमांक १७ दि.०८/०६/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** कार्यपत्रिका क्रमांक ०१ दि.२३/१०/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) कार्यपत्रिका क्रमांक ०२ दि.२८/१०/२०२०, दि.०३/११/२०२० व ०९/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ड)** कार्यपत्रिका क्रमांक ०३ दि.०९/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. मा.नितीन (आप्पा) काळजे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६०० विषय क्रमांक- १७

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

## मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

अ) कार्यपत्रिका क्रमांक १६ दि.०८/०५/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** कार्यपत्रिका क्रमांक ०१ दि.२३/१०/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. मा.नितीन (आप्पा) काळजे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६०१ विषय क्रमांक- १८

दिनांक- २०/१/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

## मा.शिक्षण समिती

अ) कार्यपत्रिका क्रमांक १६ दि.२२/०६/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** कार्यपत्रिका क्रमांक १७ दि.०२/०७/२०२०, दि.०९/०७/२०२०, १६/०७/२०२०, ०५/११/२०२० व ११/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) कार्यपत्रिका क्रमांक ०१ दि.२३/१०/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. मा.नितीन (आप्पा) काळजे–** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**----**

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/५९८/२०२१
दिनांक - ४/२/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.